

## बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २७ | बुधवार,दि.११ जून २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## नव्या शैक्षणिक सत्रात सर्वच शाळा सकाळी ९ ते ४ पर्यंत भरणार



**मुंबई**: येत्या १६ जून पासून महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळांचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात १६ जून २०२५ पासून होणार आहे.तर विदर्भातील जिल्ह्यांमधील शाळा २३ जून पासून सुरू होणार आहे.

मात्र विदर्भातील शाळा या सुरुवातीला सकाळ-सत्रामध्ये भरवल्या जातील आणि त्यानंतर या शाळा नियमित भरतील. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळा सकाळी नऊ वाजे सुरु होतील आणि सायंकाळी चार वाजेपर्यंत सुरू राहतील.

राज्यातील शाळा आता सकाळी नऊ ते सायंकाळी चार पर्यंत राहतील.शैक्षणिक वर्ष २०२५ २६ पासून सकाळी नऊ वाजेपासून ते ९:२५ पर्यंत परिपाठ राहील. ९:२५ पासून ते ११:२५ पर्यंत सुरुवातीचे तीन तासिका होतील.

११:२५ ते ११:३५ पर्यंत दहा मिनिटांची लहान सुट्टी राहील. ११: ३५ ते १२:५० पर्यंत दोन तासिका होतील.१२:५० ते दीड वाजेपर्यंत मोठी सुट्टी राहील. दीड वाजेपासून ते तीन वाजून ५५ मिनिटांपर्यंत उर्वरित तासिका घेतल्या जाणार आहेत आणि शेवटचा पाच मिनिटात वंदे मातरम होईल आणि शाळा सुटणार आहे. सदरचे वेळापत्रक येत्या शैक्षणिक वर्षांपासून अमलात आणले जाईल अशी माहिती समोर येत आहे.

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई**- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठी कार्यवाही करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यानुसार आगामी विधिमंडळ अधिवेशनात विधेयक आणण्यात येणार आहे.

सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात २००५ मध्ये अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली होती. केंद्र शासनामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग कार्यरत आहेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याशी निगडीत विषय वेगवेगळे असल्याने या दोन्हींकरिता स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची शिफारस केंद्रीय जनजाती परिषदेने केली आहे. त्यानुसार राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आले आहेत.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने, तयार करण्यात आलेल्या विधेयकाच्या प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच या आयोगाकरिता निर्माण केलेल्या २७ पदांना आयोगाच्या आस्थापनेवर हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.



### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ; बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनाही मिळणार विद्यावेतन

राज्यातील शासकीय भौतिकोपचार (फिजीओथेरपी) व्यवसायोपचार (ऑक्युपेशनल थेरपी) पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याचा आणि बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन सुरू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी अभ्यासक्रमच्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता प्रशिक्षण काळात दरमहा १ हजार ७५० रुपये विद्यावेतन मिळत होते. यामध्ये ६ हजार २५० रूपयांची वाढ करून त्यांना दरमहा ८ हजार रूपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. तर याच अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना महागाई भत्त्यासह १० हजार रूपये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. या वाढीनंतर पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना ३३ हजार ७३० रूपये इतके विद्यावेतन मिळणार. ही वाढ १ जून, २०२५ पासून मिळणार.

मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि नांदेड या पाच ठिकाणी शासकीय परिचर्या महाविद्यालयात बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम सुरू आहे. या प्रत्येकी ठिकाणी ५० विद्यार्थी शिकतात. या विद्यार्थ्यांचा आंतरवासिता कालावधी सहा महिन्यांचा असतो. या विद्यार्थ्यांना दरमहा ८ हजार रूपये विद्यावेतन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## श्रीमती मिनू पी.एम गोंदिया जि.प.च्या सीईओ



**गोंदिया**-जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगांनथम यांची प्रशासकीय बदली बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर करण्यात आली आहे.त्यांच्या जागेवर अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयांतर्गत येत असलेल्या भातुकली-तिवसा येथील सहा.जिल्हाधिकारी श्रीमती मिनू पी.एम.यांची बदली करण्यात आली आहे.श्रीमती मिनू यांनी वाशिम येथे सुध्दा काम केले आहे.त्या २०21 बॅचच्या आयएएस अधिकारी असून पोलिस विभागात क्लर्क म्हणून त्यांनी आपल्या नोकरीची सुरवात वडिलांच्या मृत्युनंतर केली.त्या केरल राज्याच्या रहिवासी असून १५० वी रँक त्यांनी प्राप्त केली होती.मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची ही पहिलीच नियुक्ती आहे.

## राज्य मंत्रिमंडळाकडून उत्पादन शुल्कात वाढ,मद्यांच्या किंमती किती?

**मुंबई** : काही दिवसांपूर्वी देशात बिअर या मद्याचे दर कमी होणार असल्याचे वृत्त माध्यमांत झळकल्याने मद्यप्रेमींनी आनंद व्यक्त केला होता. मात्र, राज्य सरकारचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीकोनात उत्पादन शुल्क विभाग मद्यविक्रीवर कर वाढविण्याचा विचार करत होते. अखेर, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत दारु विक्रीवर खचऋङ (कर) वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, मद्यप्रेमींच्या खिशाला झळ बसणार असून त्यांचं दुःख आणि सेलिब्रेशनही महागणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे, मद्यावरील शुल्क वाढीमुळे राज्याच्या तिजोरीत १४,००० कोटींचा महसूल वाढणार आहे. मद्यपींना एका क्वार्टरसाठी म्हणजेच १८० मिली दारुसाठी ८० ते ३६० रुपये मोजावे लागतील. त्यामध्ये, देशी दारु ८० रुपयांना १८० मिली मिळणार आहे. तर, विदेशी प्रिमियम ब्रँड ३६० रुपये १८० मिली असेल.

राज्याच्या महसुलात वाढ करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने मद्यविक्रीवरील करत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर दिड टक्याने वाढविण्यात आला आहे. त्यासह, विदेशी मद्यावरही हा कर वाढविण्यात आल्याने आता मद्यप्रेमींसाठी हा निर्णय खिशाला झळ देणारा आहे.

### उत्पादन शुल्क विभात १२२३ पद नव्याने भरणार

सोबतच सीलबंद विदेशी मद्यविक्री हॉटेल आणि रेस्टॉरंट कराराद्वारे भाडेतत्त्वावरती चालविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यावर दहा ते पंधरा टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार आहे. उत्पादन शुल्क विभागाला बळकटी देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागात १२२३ पदं नव्याने भरले जाणार आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभाग अंतर्गत मुंबई शहर आणि उपनगर यासाठी नव्याने विभागीय कार्यालय सुरू करणार असल्याची माहितीही समोर आली आहे. तसेच, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर आणि



अहिल्यानगर या ६ जिल्ह्यांसाठी नव्याने अधीक्षक कार्यालय सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली. उत्पादन आणि विक्रीसाठी विभागाच्या माध्यमातून एआय आधारित कंट्रोल रूम तयारी केली जाणार आहे.

दरम्यान, देशात विकली जाणारी ब्रिटिश बिअर ७५ टक्क्यांपर्यंत स्वस्त होणार असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी झळकले होते. भारत आणि ब्रिटनमधील एफटीए अंतर्गत आयात शुल्क कमी करण्याचा करार झाल्याने ही बिअर स्वस्त होणार होती. मात्र, आता राज्यात दारुचे दर वाढल्याचं सत्य मद्यपींना पचवावे लागेल.

## जिल्हा बँकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत आदिवासी प्रतिनिधीत्वापासून वंचित



**देवरी** : सहकार क्षेत्रात अत्यंत प्रतिष्ठेची माणल्या जाणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बँकेच्या सत्तेची किल्ली आपल्याकडे यावी, या अनुषंगाने राजकीय पक्षाचे पुढारीही कामाला लागले आहेत. तर दुसरीकडे पॅनलने अद्यापही अधिकृत उमेदवारांचे पत्ते उघडले नसले तरी निवडणूक लढविणाऱ्यांनी मतदारांशी भेटीगाठी सुरू केल्या आहेत.मात्र निवडणुकीतील दोन्ही पॅनलने आदिवासी समाजातील एकाही व्यक्तीला जिल्हा बँकेत प्रवेश करु द्यायचा नाही हेच ठरविल्याचे दिसून येत आहे.एकाही पॅनलने नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांनी अनु,जाती/जमाती गटातून फक्त अनु.जाती प्रवर्गातील उमेदवाराला संधी देत आदिवासी प्रवर्गासोबत अन्याय केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.हा अन्याय वर्षोनुवर्ष चालत असून सामाजिक न्यायाचे आम्ही पाईक असे सांगणारेही आदिवासी समाजाला न्याय देऊ शकले नाही ही खरी शोकातिंका ठरली आहे. विशेष म्हणजे भाजपेने आपल्या १० उमेदवारांची नावे जाहिर केली त्यामध्ये सुध्दा आदिवासी प्रवर्गाला स्थान देण्यात आले नसल्याचे दिसून आले.

येत्या २९ जून रोजी निवडणूक होणार आहे. निवडणूक रिंगणात ४५ पेक्षा अधिक उमेदवार राहणार, असे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे ८९४ मतदारांच्या हातात सत्तेची किल्ली असून ती कुणाला सोपविणार, याकडे लक्ष लागले आहे

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे वारे गरम होऊ लागले आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पुढारीही कामाला लागले आहेत. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस या तिन्ही प्रमुख पक्षाचे उमेदवार रिंगणात राहणार आहेत.गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या या निवडणुकीत २० संचालकांची निवड केली जाणार आहे. १६० नामांकन अर्जांपैकी फक्त अंबिका प्यारेलाल बंजार यांचा अर्ज अनुसूचित जाती/जमाती गटातून भरण्यात आला आहे हे आदिवासींचे दुर्दैव म्हणता येईल.

गोंदिया जिल्ह्याच्या निर्मितीनंतर, आजपर्यंत कोणत्याही पक्षाने आदिवासी समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी दिलेली नाही. अनुसूचित जाती/जमाती गटातून फक्त एकच पद राखीव असल्याने, या गटातून नेहमीच अनुसूचित जातीच्या कोट्यातून प्रतिनिधी निवडला जात आहे. त्यामुळे अनुसूचित जमाती (आदिवासी) वर अन्याय झाला आहे आणि त्यांना कधीही संधी देण्यात आलेली नाही. एकीकडे गोंदिया जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून सांगायचे आणि राजकीय लाभ घेतांना डावलायचे अशी स्थिती आहे.

# १२ कुरव्यात नक्षल्यांची शस्त्रांसह शरणागती



**गडचिरोली** - राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील कवंडे गावात पोहोचले. या अतिदुर्गम आणि नक्षलप्रभावित भागात जाणारे ते राज्याचे पहिले मुख्यमंत्री ठरले. त्यांच्या उपस्थितीत कोट्यवधींचे बक्षीस असलेल्या १२ नक्षलवाद्यांनी शस्त्रांसह शरणागती पत्करली. शस्त्रांसह शरणागती पत्करणारे अशाप्रकारची ही पहिलीच घटना आहे.

यापूर्वी शरणागती पत्करलेल्या १३ पूर्वाश्रमीच्या नक्षल्यांचा आज एक सामूहिक विवाह सोहळाही गडचिरोलीत आयोजित करण्यात आला होता, त्याला हजेरी लावत त्यांनी नवदाम्पत्यांना नवजीवनाच्या शुभेच्छा दिल्या. सायंकाळी त्यांनी सी-६० जवानांचा सत्कार केला आणि त्यांना अत्याधुनिक अशी एके-१०३ शस्त्रे आणि एएसएमआय पिस्तुल, बुलेटप्रुफ जॅकेट्स प्रदान केली. त्यांच्या शौर्याची प्रशंसाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. जिल्हा नियोजन विकास निधीतून १९ चारचाकी वाहने खरेदी करण्यात आली आहेत. त्यातील काही बुलेटप्रुफ वाहने आहेत. त्यांच्या चाब्या त्यांनी पोलिस दलाकडे सुपूर्द केल्या. या दौं?यात मंत्री आशिष जयस्वाल, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ मिलिंद नरोटे, पोलिस उपमहानिरीक्षक अंकीत गोयल, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल आदी मान्यवर उपस्थित होते.

### सी-६० जवानांचा सत्कार

सी-६० जवानांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कवंडे आऊटपोस्टला मी भेट दिली आणि गावकर्?यांशी संवाद साधला. आपल्या पोलिस दलाने अवघ्या २४ तासात कवंडे आऊटपोस्टचे निर्माण केले. हे केवळ पोलिस ठाणे नाही, तर शासन प्रशासन जनतेपर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम आहे. जेथे सुरक्षेची कमतरता होती, तेथे पोलिस ठाणे उघडत शासन-प्रशासन जनतेपर्यंत पोहोचविले जात आहे. गेल्या दोन वर्षांत अशा ६ आऊटपोस्ट तयार केल्या. गेल्या दीड वर्षांत २८ माओवाद्यांना मारले, ३१ माओवाद्यांना अटक झाली, तर ४४ लोकांनी आत्मसमर्पण केले. हा



एक नवीन रेकॉर्ड आहे. ज्यांच्यावर खूप मोठ्या रकमेची बक्षीसं होती, असेही अनेक आता माओवाद सोडून सामान्य जीवनात परत येत आहेत. आपली ही लढाई आता अंतिम टप्प्यात आहे. कवंडे येथे तर अतिशय कठीण ऑपरेशन्स आपल्या जवानांनी केले. ज्या बेटावर नक्षलवादी लपून बसले होते, ते ठिकाणही मी पाहिले. डोके पाण्यात बुडेल, अशा ठिकाणी कसब दाखवून तुम्ही ४ नक्षल्यांना यमसदनी धाडले, हे कौतुकास्पद आहे. मार्च २०२६ पर्यंत नक्षलवादाचा खात्मा करायचा, हे आपले टार्गेट. महाराष्ट्रात ४ वर्षांपासून नक्षल भरती पूर्णपणे थांबली होती. पण, अन्य राज्यातून ती व्हायची. पण, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अतिशय कठोर पाऊले उचलली आणि आता नक्षलवाद संपण्याच्या मार्गावर आहे.

१२ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. त्यांच्यावर १ कोटी रुपयांपेक्षा अधिकचे बक्षीस होते. त्यांनी अत्याधुनिक शस्त्रांसह आत्मसमर्पण केले आहे. त्यांना भारताच्या संविधानाची प्रत आपण भेट दिली. लॉईडसारख्या उद्योगांनी पुनर्वसनात मोठा हातभार लावला आहे. हा जिल्हा रोजगारयुक्त करायचा आणि भारताचे पोलाद शहर म्हणून तो विकास करायचा आहे. हे करताना येथील निसर्गसंपदा, जल, जमीन, जंगल कायम ठेवूनच हा विकास करण्याचा शासनाचा निर्धार आहे.

### नक्षलग्रस्त भागात परिवर्तनाचे वारे; गडचिरोली जिल्हा औद्योगिक केंद्र बनेल !

छत्तीसगड सीमेलगतच्या अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त कवंडे भागात आयोजित लाभार्थी मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट जनतेशी संवाद साधला, तेव्हा ते म्हणाले की, गडचिरोलीला नक्षलमुक्त व औद्योगिकदृष्ट्या सक्षम जिल्हा बनवण्याचा आमचा निर्धार आहे. शासन आणि प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून नक्षलग्रस्त भागात परिवर्तनाचे वारे वाहू लागले असून, शासनाच्या सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचत असल्यामुळे लोकांमध्ये शासनाबाबतचा विश्वास वाढला आहे. हीच खरी लोकाभिमुख विकास प्रक्रिया आहे. कवंडे, नेलगुंडा आणि पेनगुंडा या ठिकाणी नुकतीच ङ्गधरती आबाफ अभियानांतर्गत शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये एकूण ५३३ लाभार्थ्यांना विविध योजनांचे ९८७ लाभ वितरित करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, अन्न सुरक्षा योजना, पीएम किसान सन्मान निधी, मनरेगा जॉब कार्ड, स्क्रिनिंग व अ?ॅनिमिया तपासणी, आधार अद्ययावत करणे, जात प्रमाणपत्र आदी योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. महसूल, आरोग्य, कृषी, सामाजिक न्याय, पंचायत राज, महिला व बालकल्याण, वन विभाग, पोलिस आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले होते.

### महाराष्ट्र-छत्तीसगड राज्याला जोडणाऱ्या पुलाची ड्रोनद्वारे पाहणी

नक्षलग्रस्त भागातील नागरिकांना मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील पूल एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरणार आहे. दुर्गम भागातील कनेक्टिव्हिटी सुधारून विकासाची गंगा पोहोचवणे, हा शासनाचा दृढ निर्धार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. ड्रोनच्या मदतीने त्यांनी या पुलाची पाहणी केली.

राज्यमार्ग ३८० वरील १०० मीटर रुंद कोरमा नाल्यावर सध्या १२० मीटर लांबीचा पूल उभारण्यात येत असून, यामुळे महाराष्ट्र व छत्तीसगड या दोन राज्यांतील थेट दळणवळण शक्य होणार आहे. या प्रकल्पासाठी १० कोटी ७० लाख रुपयांची तांत्रिक मान्यता प्राप्त असून, हा पूल लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक विभागाला दिले. या पुलाच्या निर्माणामुळे गडचिरोली जिल्ह्यातील शेवटच्या टोकावरील गावांनाही सुकर दळणवळणाची सुविधा प्राप्त होणार असून, प्रशासनाच्या सेवा व विकास कार्यक्रम प्रभावीपणे पोहोचण्यास मोठी मदत होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.


## स्किनहेल्थ क्लिनीक



**डॉ. अविनाश कटरे**

एम.बी.बी.एस.एमडी (स्किन)

त्वचारोगतज्ज्ञ

उपलब्ध सुविधाएँ...

- काले दाग, सफेद दाग
- चेहरे पर किसी भी प्रकार की एलर्जी
- इसबगोल (एक्जिमा)
- कोड, कुष्ठरोग
- मस्से, तिल
- सोरायसिस
- पित्त, खुजली
- बाल झड़ना
- गंजापन, रूसी होना
- अन्य चर्मरोग, गुप्तरोग
- सभी प्रकार के त्वचा रोग
- मुरुम व मुरुम के काले दाग
- मस्सा निकालना
- दाद, खाज, खुजली
- इन सभी रोगो पर उपचार व मार्गदर्शन







Mob. No. +91 92092 88648

Behind Majar, Ring Road, Near Sahyog Hospital, GONDIA

Shri Tirupati Upchar Kendra Dr. T D Katre Hospital

Ambedkar Chowk Gondia Road, Amgaon

## संपादकीय

# लोकलची जीवघेणी गर्दी, निरपराध प्रवाशांचे बळी

मुंबईची विस्तारीत उपनगरे असलेल्या दिवा-मुंब्रा दरम्यान खचाखच गर्दीने धावणाऱ्या लोकलमधील दरवाजात उभे असणारे काही प्रवासी खाली पडले आणि त्यातच काहींचे बळी गेले तर काही जखमी झाले. सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. या दिवशी मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले व ही दुर्घटना घडली अशी माहिती सुरुवातीला पुढे आली. नेमके किती मृत्युमुखी पडले किंवा नेमके किती जखमी झाले याची माहितीसुद्धा धड मिळत नव्हती. मुंबईच्या उपनगरी रेल्वेतून रोज पंचाहत्तर लाखांहून अधिक प्रवास करतात.

एवढ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर सीएसटी-चर्चगेटपासून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेल आणि विरार, पालघर, डहाणूपर्यंत लोकल्स धावत असतात. मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे. याच महामुंबईतून देशाच्या खजिन्यात सर्वात जास्त महसूल जमा होतो. याच महानगरातून देशाला सर्वात जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय ७५ लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते?

मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील दादर, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, कळवा, डोंबिवली, कल्याण तसेच अंधेरी, वसई-विरार या स्थानकांवर नेहमीच गर्दीचा कहर असतो. सीएसटीवरून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेलला जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल्स तुडुंब गर्दीने नेहमीच भरलेल्या असतात. कोंडवाड्यात जशी जनावरे दावणीला असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी व सीएसटीहून कसाराकडे जाणारी या लोकल जात असताना दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले.

धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वत:चा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही. देशात जिकडे तिकडे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहे. वंदे भारत ट्रेनची क्रेझ वाढत आहे. पण मुंबईतील लोकल्समधून रोज प्रवास करणारे लाखो प्रवासी मात्र वाऱ्यावर सोडले आहेत. रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत आहेत आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत.

गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार? सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या दोन वर्षांत एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या आहेत. जशी त्यांची संख्या वाढत आहे तसे विना एसी लोकल्स कमी होत आहेत. मुंबईत एसी लोकल्स हव्या आहेत, त्याला मागणीही बरीच आहे. एसी लोकल्समधून प्रवास करणारा वर्गही मोठ्या संख्येने आहे. पण सर्वसाधारण लोकल परवडते म्हणून त्या लोकलने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांवर अन्याय होता कामा नये याची दक्षता रेल्वे प्रशासनाने घेतली पाहिजे.

गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात ५१,८०२ लोकांचा मृत्यू झाला. मुंबईत रेल्वे अपघातात रोज सात ते आठ लोक मरण पावतात. पण त्याची कुठे बातमीही प्रसिद्ध होत नाही. ङ्गरोज मरे त्याला कोण रडेफ अशी मुंबईच्या उपनगरी रेल्वेची अवस्था झाली आहे. सन २०२५ या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात ६६३ लोक ठार झाले. त्यातले २७२ जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर ३९१ जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडून मरण पावले किंवा जखमी झाले, असे प्रथमच घडले असावे. आता तरी राज्य सरकार, केंद्र सरकार व रेल्वे प्रशासन यांचे डोळे उघडणार आहेत की नाही? मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? प्रत्येक ट्रेनमध्ये प्रत्येक लोकलच्या डब्यात विनातिकीट अनेक प्रवासी असतात.

प्रथम श्रेणीच्या डब्यातही विनातिकीट लोकांची अगदी महिलांचीही बरीच गर्दी असते. आपल्याला तिकीट कोणी विचारायला येणार नाही याची त्यांना खात्री असते. विनातिकीट प्रवासी हे दैनंदिन पासधारकांना रोजची डोकेदुखी असते पण धावत्या लोकलमध्ये डब्यात येऊन तिकीट तपासणी जवळपास बंदच झाली आहे. मध्य व पश्चिम रेल्वेचे टीसी जातात कुठे हा पासधारकांना रोज प्रश्न पडलेला असतो. भिखारी, फेरीवाले, विक्रेते, डब्यात गलिच्छ फडकी मारून सफाई केल्याचा आव आणणाऱ्यांची गर्दी भरपूर असते.

हातात तान्हे बाळ घेऊन भीक मागणाऱ्यांची संख्याही बरीच आहे. हे सारे लोक स्टेशनात तरी कसे येतात, लोकलमध्ये कसे चढू शकतात? यांना रोखणारी, हटवणारी, व कारवाई करणारी यंत्रणा कुठे दिसत नाही. लोकलधील खचाखच गर्दीमध्ये पाकीटमार व मोबाईल चोरांच्याही टोळ्या सावज शोधत असतात. पण कुठे रेल्वे पोलिसांचा त्यांना धाक आहे असे कुठे दिसत नाही. मुंब्रा येथे गर्दीत तोल न सावरता आल्यामुळे डझनभर प्रवासी खाली पडले, ही गर्दी नियंत्रित होणार नसेल तर पुढेही असे अपघात होत राहतील. मुंबईची जीवनवाहिनी सुरक्षित राहिली पाहिजे याची जबाबदारी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांची आहे.

# जातवर्ग व्यवस्थेचा उदय

ईस्ट इंडिया कंपनीने उच्च जातीशी हातमिळवणी करत शोषण व्यवस्था टिकवली. मिशनऱ्यांच्या शिक्षण व सुधारणा कार्याला विरोध करत ब्राह्मणांचा रोष टाळण्यासाठी ब्रिटिशांनी प्राच्य शिक्षणाला प्रोत्साहन दिले. परिणामी, जातवर्ग व्यवस्थेचा पाया मजबूत झाला व त्यातून सामाजिक विषमता कायम राहिली.

प्रभुत्वशाली व अंकित वर्गाचा हितसंबंधाचा संघर्ष जगाच्या इतिहासात सातत्याने होत आलेला आहे. अतिरिक्त उत्पादनाचे समान वाटप की मूठभरांचे हितसंबंध ? हा मूळ प्रश्न या संघर्षामध्ये केंद्रवर्ती राहिला आहे, हा संघर्ष दडवून ठेवण्यासाठी किंवा त्याची तीव्रता कमी करण्यासाठी संस्कृती व शिक्षणाचा वापर सत्ताधारी करत आलेले आहेत. शोषण व अंकित्व नैसर्गिक आहे, नैतिक आहे, अपरिहार्य आहे अशी विचारसरणी शोषितांची घडवली जाते. यातून सत्ताधारी दोन गोष्टी साध्य करतात. शोषण व्यवस्था कायम ठेवण्यात व सत्तेच्या बाजूने जनमत घडवण्यात यशस्वी होतात. दुसऱ्या बाजूला अंकित वर्ग प्रभुत्वशाली विचारसरणीचा भाग बनल्यामुळे शोषणाची कारणमीमांसा व मुक्तीचा मार्ग अवरुद्ध होतो. या दोन बाबी सत्ताधाऱ्यांच्या बाजूने घडत असल्या तरी दुसऱ्या बाजूने व्यवस्था बदलाचा विचार, संस्कृती व चळवळ अस्तित्वात असते. व्यवस्थेची चिकित्सा व पर्याय मांडून मुक्तीच्या मार्गाचा पुरस्कार करत असते. या सूत्रानुसार वसाहतिक काळातील ताणेबाणे समजून घेणे आवश्यक आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेनंतर क्रमाक्रमाने व्यवस्थेत बदल घडला. या बदलाचे तात्त्विक अधिष्ठान कोणते? ईस्ट इंडिया कंपनी भारतात आल्यानंतर जातिव्यवस्थेवर कोणते परिणाम झाले? उत्पादन साधन व संबंधात काही बदल घडले का? शिक्षणात कोणते परिवर्तन झाले ? ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना भारतात ३१ डिसेंबर १६०० मध्ये झाली. कंपनीची स्थापना भारतात आणि दक्षिण आशियात करण्यात आली. व्यापार करण्यासाठी कंपनीने जगभर पाय पसरले. सुरुवातीला व्यापारातून नफा व जास्तीत जास्त नफा कमावण्याचा दृष्टिकोन कंपनीचा होता. हळूहळू कंपनीचे मोठे साम्राज्य तयार झाले. हे साम्राज्य टिकवण्यासाठी ते सत्ताधारी झाले. साम्राज्यवादी राजकीय भूमिकेपर्यंतचा प्रवास ईस्ट इंडिया कंपनीचा झाला. या प्रवासात कंपनीला मुख्य तीन आव्हाने होती मसाल्याच्या पदार्थाच्या व्यापारात स्पेन व पोर्तुगीज यांची एकाधिकारशाही, ब्रिटिश व्यापारी वर्ग व भारतातील उच्च जाती. या प्रमुख तीन आव्हानांचा सामना कंपनीला करावा लागला. कंपनीने मसाल्याच्या पदार्थापासून व्यापार सुरू करून ब्रिटनमधील उत्पादित मालाला भारतात

ईस्ट इंडिया कंपनीने उच्च जातीशी हातमिळवणी करत शोषण व्यवस्था टिकवली. मिशनऱ्यांच्या शिक्षण व सुधारणा कार्याला विरोध करत ब्राह्मणांचा रोष टाळण्यासाठी ब्रिटिशांनी प्राच्य शिक्षणाला प्रोत्साहन दिले. परिणामी, जातवर्ग व्यवस्थेचा पाया मजबूत झाला व त्यातून सामाजिक विषमता कायम राहिली.

बाजारपेठ मिळवून दिली होती. भारतातील उत्पादित माल निर्यात करण्याची भूमिकाही कंपनीची होती. कापड निर्यात करण्यासाठी मसाल्याच्या पदार्थासह सुती व सिल्क कपडे, चहा व साल्टपीटरचा व्यापार सुरू करण्यात आला. भारतातील स्वस्त मजुरांची उपलब्धता लक्षात घेऊन १६२०च्या सुरुवातीला गुलाम मजुरांची पद्धत सुरू करण्यात आली व गुलाम मजूर निर्यात (विक्री) करण्यापर्यंत पोहोचली. हे गुलाम मजूर भारतातील कनिष्ठ जातींचे होते. कंपनीचे साम्राज्य देशभर पसरल्यानंतर साम्राज्य सुरक्षित करण्यासाठी व विरोधकांवर अंकुश लावण्यासाठी कंपनीने सैन्यबल निर्माण केले.

१७६०-१८४० मध्ये ग्रेट ब्रिटन, अमेरिका आणि खंडीय युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. इंग्लंडमधील उगवत्या भांडवलदारांनी व व्यापाऱ्यांनी कंपनीच्या आयात धोरणाला विरोध केला व निर्यात वाढवण्याची भूमिका घेतली. भारतातील पारंपरिक उत्पादन कमजोर करून ब्रिटिश उत्पादनावर अवलंबित्व वाढवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. भारताला मुक्त व्यापाराचे केंद्र बनवले गेले. यातून ईस्ट इंडिया कंपनी व लंकेशायरचे उगवते उद्योजक यांच्यात संघर्ष सुरू झाला. या संघर्षात ईस्ट इंडिया कंपनी पराभूत झाली. तिचे व्यापार अधिकार संपुष्टात आले. १८३२ मध्ये संसदेत (पार्लमेंट) विधेयक पास झाले. यात दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या चार्टरमध्ये सुधारणा करून कंपनीचे व्यापारी अधिकार संपुष्टात आणले व तिचे प्रशासनिक संस्थेत रूपांतर करण्यात आले. धर्म, जन्मस्थान, वंश, रंग या निकषावरील नियुक्तीची बंदी हटवण्यात आली. सत्ता व जनता यांचा मध्यस्थ वर्ग निर्मितीसाठी नियुक्तीचे निकष बदलले होते. याचा सर्वाधिक लाभ भारतातील उच्च जातींना झाला. युरोपच्या तुलनेत जवळजवळ शंभर वर्षांनंतर भारतात औद्योगिक उत्पादनाची सुरुवात झाली. ब्रिटिशांनी युरोपमध्ये सामंती उत्पादन पद्धती नष्ट करून औद्योगिक उत्पादन सुरू करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे येथे वर्गीय समाजरचना अस्तित्वात आली. भारतात सामंती उत्पादनाशी समायोजन करण्याची भूमिका घेऊन मिश्र उत्पादन पद्धतीचा पुरस्कार ब्रिटिशांनी केला. भारतातील सामंती उत्पादन जातीबद्ध होते. औद्योगिक उत्पादन पद्धतीने जातीय उत्पादन संबंध नष्ट झाले असते व जातिव्यवस्थेचा भौतिक व सांस्कृतिक ढांचा

कोसळला असता. असे केल्याने प्रभुत्वशाली उच्च जातींचा रोष पत्करावा लागणे अपरिहार्य होते. साम्राज्यवादी सत्तेला धोका निर्माण होऊ शकला असता. हे टाळण्यासाठी मिश्र उत्पादन पद्धतीचा पुरस्कार ब्रिटिशांनी केला. भारतातील प्रभुत्वशाली जातवर्गाशी हातमिळवणी करून त्यांच्या हितसंबंधाची पाठराखण करण्याचे धोरण ब्रिटिश सत्तेने घेतले. यातून जातवर्गीय व्यवस्थेचा पाया घातला गेला.

ब्राह्मणांचा रोष ओढवून न घेण्याची खबरदारी ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकारने मिशनरीच्या कामावर बंदी आणून व कॉलेज उघडून घेतली. सुधारवादी, मानवतावादी व सेवेची भूमिका घेऊन मिशनरी कार्यरत होते. जातीप्रथा व परंपरेत सुधारणा, शैक्षणिक व सेवाकार्य करत होते. जातिव्यवस्थेच्या अमानवी प्रथेचा विरोध करून त्यातून बाहेर पडण्याचा उपदेश करत होते. आधुनिक ज्ञान व बायबलचे स्थानिक भाषेत रूपांतर करून शिकवण देत होते. आरोग्यसेवा उपलब्ध करत होते. विशेषतः त्यांचे कार्य खालच्या जातीमध्ये होते. ज्यांना शिक्षणाची बंदी होती, ज्यांना अस्पृश्य मानले जात होते त्यांच्यासाठी मिशनरीचे कार्य देवदूतासारखे होते. मिशनरींच्या या कार्याचा प्रभाव जनतेवर पडत होता. त्यातून अनेकांनी हिंदू धर्म त्यागून धर्मांतर केले. त्यामुळे उच्च्च जातींचा व मुस्लिम उच्चवधूंचा मिशनरींच्या कार्याला विरोध होता. हा विरोध केवळ हिंदू-मुस्लिम शिक्षणापुरता मर्यादित नव्हता, तर इंग्रजी आणि पाश्चात्य शिक्षणालाही विरोध होता. ईस्ट इंडिया कंपनीने ब्राह्मणांची, मुस्लिम उच्चभ्रूची बाजू घेतली. मिशनरींच्या कामावर बंदी घालून प्राच्य विद्येचा पुरस्कार केला. दुसरे उदाहरण १८२० मध्ये पुणे येथे एलफिन्स्टन कॉलेजच्या स्थापनेचे आहे. १८१८ मध्ये पेशवाला सत्तेतून हटवल्यामुळे ब्राह्मण नाराज झाले. शिक्षित ब्राह्मणांना सामावून घेण्यासाठी एलफिन्स्टन कॉलेजची स्थापना केली. इंग्रजांना निकृष्टतून निकृष्ट वाटणारे ब्राह्मणी ज्ञान शिकण्याची व्यवस्था कॉलेजमध्ये ब्रिटिश सत्तेने केली. सुरुवातीला या कॉलेजचे स्वरूप संस्कृत पाठशाळेसारखे होते. उच्च जातींची पाठराखण जातिव्यवस्थेच्या संरक्षणासाठी केली जात होती. जातिव्यवस्थेवर वर्गव्यवस्थेचे कलम केल्याचे शरद पाटील सांगतात. या जातवर्गीय व्यवस्थेतील शिक्षणप्रवास इथून सुरू होतो.

रमेश बिजेकर
ramesh.bijekar@gmail.com

# बालविवाह थांबविण्यास प्रशासनाला यश



**गोंदिया :** जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महिला व बाल विकास अधिकारी गोंदिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील मेंदीपूर ढिवरटोला येथे एका १५ वर्षीय बालिकेचे नियोजित बाल विवाह थांबविण्यात आले. २ जून २०२५ रोजी सकाळी ९ वाजता रितीरीवाजानुसार विवाह नियोजित करण्यात आले होते. विवाह स्थळी वधु पक्षाकडील पाहुणे वधुच्या घरी हजर झाले होते. लग्न मंडप व जेवण तयार झाले होते. याविषयी गावातील स्थानिकांना गुप्त माहिती मिळताच विवाहाच्या ठिकाणी गेले आणि बालिकेचे आधारकार्ड व टी.सी. यावरुन बालिकेची वय तपासणी केली असता बालिकेची वय ही १५ वर्ष ०५ महिने एवढी होती. त्यामुळे तेथे उपस्थित असलेल्यांना समजावून सांगितले की, हा विवाह बालविवाह आहे आणि बालविवाह करणे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे हा विवाह सोहळा त्वरित थांबवा आणि वर पक्षाला लगेच फोन करुन कळवा की, बालिकेची वय कमी असल्याने हा विवाह सोहळा थांबविण्यात येते अशी सूचना दिली.

प्रथम बालिकेचे नातेवाईक ऐकून घेण्यास तयार नव्हते. परंतु त्यांना बालविवाह कायदा या विषयाची माहिती दिली असता बालिकेच्या मामाने वर पक्षाला फोन करुन सांगितले की, ते वरात घेऊन येणार नाही ते जिथे आहेत तिथेच थांबवा, त्यामुळे विवाह स्थळी वर पक्ष हजर झालेला नाही. सदर बालिकेचे आई व वडील नसून दोघेही काही वर्षापूर्वी आजाराने मरण पावले, त्यावेळी बालीकेची वय ०६ महिने होती. तेव्हापासून तिचे मामा आणि आजी हे बालिकेचे पालन पोषण करीत आहेत. बालिकेची मावशी हिने हे स्थळ शोधले व प्रथम पाहण्याचा कार्यक्रम झाला. मुलगा चांगला आहे म्हणून बालिकेने सुध्दा होकार दिले व नंतर साक्षगंध झाले व २ जून २०२५ रोजी विवाहाची तारीख होती.

प्रथम गावातील स्थानिकांनी विवाह स्थळी पोहचून चौकशी करुन नंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अंतर्गत बाल संरक्षण कक्ष गोंदिया, दामिनी पथक व इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी गोंदिया यांना नियोजित बालविवाह विषयी माहिती दिली असता जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे, संरक्षण अधिकारी मुकेश पटले, समुपदेशक मनिषा मोहुर्ले, धर्मेंद्र भेलावे, तसेच इंडियन सोशल वेलफेअर सोसायटीचे प्रमुख अशोक बेलेकर, ज्ञानेश्वर पटले, दिपमाला भालेराव तसेच दामिनी पथकाचे पुजा सुरळकर, प्रशांत बंसोड, वैशाली भांदकर, पुनम मंजुरे, प्रिती बुरेले व सुवर्णा मडावी यांनी संयुक्तपणे विवाह स्थळी जावून नियोजित बाल विवाह थांबविले.

मागील तीन वर्षात एकूण १३ बालविवाह थांबविण्यास जिल्हा बाल संरक्षण कक्षाला यश आले. यामध्ये दोन बाल विवाहामध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कायद्यानुसार मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ वर्ष असावे. परंतु बऱ्याच वेळी माहिती अभावी तसेच चांगला स्थळ मिळावा व अत्यंत गरिबीमुळे सुध्दा विवाह लावून दिले जातात, त्याचा दुष्परिणाम मुलीवर तिच्या आरोग्यावर व तिच्या वैवाहिक जीवनावर होतो. जिल्ह्यात कुठेही अशाप्रकारचे बालविवाह होत असल्यास जिल्हा महिला व बाल विकास विभागाअंतर्गत कार्यरत चाईल्ड हेल्प लाईनच्या १०९८ टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. या तीन महिन्यात पोक्सो प्रकरणात एकूण २८ व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

# गुदमा ते गंगाझरी २४ किमी थर्डलाइनचे काम झाले पूर्ण

**गोंदिया :** दक्षिण पूर्व मध्य रेल्वेअंतर्गत कळमना ते दुर्गदरम्यान थर्ड लाइनचे काम करण्यात येत आहे. याच लाइनचे गुदमा ते गंगाझरी दरम्यानचे २४ किमीचे शिल्लक काम पूर्ण करण्यात आले आहे. या कामाची रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ४ आणि ५ जून रोजी पाहणी करून या लाइनवर स्पीड ट्रायल घेतली. ती यशस्वीपणे पार पडली. त्यामुळे हावडा-मुंबई मार्गावरील रेल्वे वाहतूक गतिमान होणार असून रेल्वे गाड्यांचा लेटलतीफपणा आता कायमचा दूर होणार आहे.



हावडा-मुंबई मार्गावरील बिलासपूर ते नागपूरदरम्यान सर्वाधिक मालगाड्या धावतात. तर रेल्वे विभागाला सर्वाधिक महसूल देणारा हा मार्ग आहे. मात्र, मालगाड्यांमुळे प्रवासी गाड्यांवर परिणाम होत होता. ही अडचण दूर करण्यासाठी दक्षिण पूर्व मध्य रेल्वे विभागाने दुर्ग ते कळमनादरम्यान २४० किमीची तिसरी लाइन तयार करण्याचे काम हाती घेतले.

त्यापैकी गुदमा ते गंगाझरी या २४ किमी रेल्वे लाइनचे काम शिल्लक होते. हे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले. या कामाची रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ४ व ५ जून रोजी पाहणी केली. तसेच या लाइनवर स्पीट ट्रायल घेऊन हा रेल्वे मार्ग वाहतुकीसाठी पूर्ण सुरक्षित असल्याची खात्री करून घेतली. मुख्य रेल्वे संरक्षण आयुक्त जनक कुमार गर्ग यांच्या नेतृत्वात ही पाहणी करण्यात आली.

थर्ड लाइनचे काम केव्हा पूर्ण होते याकडे रेल्वे प्रवाशांच्या नजरा लागल्या होत्या. या कामामुळे रेल्वे गाड्यांना होणार विलंबाची समस्या कायमची दूर होणार आहे. आता हे काम पूर्ण झाल्याने दिलासा मिळाला आहे.

### अधिकाऱ्यांच्या चमूत यांचा समावेश

बिलासपूर मुख्यालयाचे मुख्य प्रशासनिक अधिकारी आलोक तिवारी, नागपूर मंडळाचे रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता, आर. के. सिंह, मुख्य अभियंता मुकेश कुमार मिश्रा, योगेश परतेती व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### थर्ड लाइनमुळे अनेक समस्या दूर होणार

कळमना ते दुर्गदरम्यान तयार करण्यात आलेल्या थर्ड लाइनमुळे या मार्गावरील रेल्वे गाड्यांची वाहतूक अधिक जलद होईल. तसेच मालगाड्यांमुळे प्रवासी गाड्यांना होणार विलंब टाळण्यास मदत होणार आहे. तर गोंदिया येथील आरओआरमुळे जबलपुर-गोंदियाकडून येणाऱ्या गाड्या या विना क्रॉसिंग बल्लारशाह रेल्वे मार्गाकडे जाणार आहेत. त्यामुळे गाड्या आउटरवर थांबून राहण्याची समस्यासुद्धा दूर होणार असल्याचे आयुक्त जनककुमार गर्ग यांनी सांगितले.

### आझाद हिंद एक्स्प्रेसचे वेळापत्रक ढासळले

गेल्या दहा बारा दिवसांपासून हावड़ा-पुणे आझाद हिंद एक्सप्रेसचे वेळापत्रक पूर्णपणे ढासळले आहे. पुणेहून गोंदिया येथे दुपारी १२ वाजता पोहोचणारी ही एक्स्प्रेस रात्री ११ वाजता पोहोचत आहे. तर हावडाहून गोंदियाला दुपारी १:४५ वाजता पोहोचणारी ही गाडी रात्री १० वाजता पोहोचत असल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# जिल्ह्यातील योग शिक्षकांवर सहा महिन्यापासून उपासमारीची पाळी

**चित्रा कापसे/तिरोडा :** गोंदिया जिल्ह्यातच नाहीतर संपूर्ण महाराष्ट्रात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्रात योग शिक्षकांची अल्प मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात आली होती.त्या योग शिक्षकांना गेल्या सहा महिन्यापासून मानधन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.अध्यक्ष,उपाध्यक्ष यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतरही या योग शिक्षकांच्या न्याय मागण्यांकडे लक्ष द्यायला कुणीच तयार नसल्याने आताःआम्ही करायचे तरी काय अशा प्रश्न या योग शिक्षकांच्या मनात आलेल आहे.



शासन निधी उपलब्ध करुन देत नाही,म्हणून जिल्ह्यातील संपूर्ण योग शिक्षण बंद पडले आहे. त्यामुळे लहान मुलांना,नागरिकांना महिला वर्गाला योग शिक्षण देऊन योगासने कसे करावे व फायदा काय हे शिक्षक कोरोना काळात कुणीही कुणाला मदत करीत नव्हता तेव्हा यांनी जिवाची पर्वा न करता लोकांना योग शिक्षणाचे धडे दिले.लोकांना योग करून आपले शरीर निरोगी कसे करायचे यावर मार्गदर्शन केले, परंतु मागील सहा महिने झाले त्यांना मानधन मिळाले नाही, त्याच्या कुटूंबावर आर्थिक संकट आले आहे.त्यानी आपली व्यथा जिल्हा कार्यालय नवेझरी येथे भेट घेऊन प्रहार जिल्हा अध्यक्ष महेंद्र भांडारकर याना सागितले.त्याची यासंदर्भातील आपली व्यथा प्रहारचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र भांडारकर यांच्याकडे मांडली.आणि त्यांच्यासबोत जिल्हा परिषद गाठले.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन माहिती दिली त्यावर त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना भेटायला सांगितले.लगेच यांच्या दालनात सविस्तर चर्चा करण्यात आली. योग शिक्षकांना मानधन देण्यात यावे व पुन्हा त्याना योग अभ्यासाकरीता नियुक्त करावे असे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी प्रहार जिल्हा अध्यक्ष महेंद्र भांडारकर ,सुलोचना होरे,लक्ष्मी आबेडांरे,मेघा कन्हेवार,श्रद्धा देशमुख, श्रीलंका मेश्राम, तुप्ती ग्रेवाल,सौरभ बघेले,रविशंकर नागपुरे,पुस्तकला कटरे,देबीलाल कटरे अन्य योग शिक्षक उपस्थित होते.

# १२ जून रोजी जागतिक बालकामगार प्रथाविरोधी दिन

**गोंदिया :-** शिक्षण व आरोग्य हे प्रत्येक बालकांचे मूलभूत अधिकार असून, भारतीय राज्यघटनेनुसार यांचे संरक्षण अत्यावश्यक आहे. या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी बालकामगार प्रथेला आळा घालणे गरजेचे आहे. या अनुषंगाने १२ जून हा दिवस ङ्गजागतिक बालकामगार प्रथाविरोधी दिनफ म्हणून देशभर साजरा केला जातो.बालमजुरी ही सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांशी निगडित असून याबाबत व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. १९८६ पासून केंद्र शासनाने बाल व किशोरवयीन कामगारांसाठी अधिनियम पारित केला आहे. या कायद्यानुसार १४ वर्षांखालील मुलांकडून कोणतेही धोकादायक किंवा अयोग्य काम करून घेणे कायद्याने गुन्हा आहे. तसेच, १४ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलांकडून धोकादायक उद्योगांमध्ये काम करून घेणेही बेकायदेशीर आहे. यासाठी दोषींवर पन्नास हजार पर्यंत दंड अथवा दोन वर्षांपर्यंत शिक्षा अशी तरतूद आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सर्व दुकानदार, आस्थापनांचे मालक, उद्योगपती, बांधकाम व्यावसायिक, वितरक, व्यापारी व इतर संबंधित घटकांना बालकामगार न ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे. कोणी बालकामगार ठेवत असल्याचे निदर्शनास आल्यास तत्काळ संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन गोंदिया येथील सहाय्यक कामगार आयुक्त रा.मो. धुर्वे यांनी केले आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता, शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# हिवतापाकरिता 'त्या' १३८ गावांवर लक्ष

**गोंदिया:-** गोंदिया जिल्हा हा कीटकजन्य आजाराकरिता अतिसंवेदनशिल असून, जिल्हयात होणाऱ्या अनियमित पावसामुळे डास उत्पत्तीला पोषक वातावरण तयार होऊन मोठ्या प्रमाणात डासांची पैदास होत असल्याचे दिसून आले आहे. तसेच स्थलांतरीत होऊन परत आलेल्या मजूरांमध्ये हिवतापाची लक्षणे आढळून येवून नंतर ते हिवताप दूषित आढळून आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हिवतापाकरिता अतिसंवेदनशील असलेल्या १३८ गावांवर आरोग्य विभागाने लक्ष केंद्रीत केले.

हिवतापाची लागण झालेल्या गावांतील मागील ३ वर्षाची आकडेवारी बघता सालेकसा, देवरी, मोरगाव अर्जुनी, सडक अर्जुनी हे चारही तालुके अतिसंवेदनशील असून, त्यातील १३८ गावांवर पावसाळ्यापूर्वी प्रतिबंधासाठी आरोग्य विभाग मिशन मोडवर काम सुरू केले आहे. सालेकसा तालुक्यात सर्वाधिक ६२ गावे, देवरी तालुक्यात ३६ गावे, अर्जुनी मोरगाव तालुक्यात २५ गावे तर सडक अर्जुनी तालुक्यात १५ असे एकूण हिवतापाकरिता अतिसंवेदशील १३८ गावावर पावसाळ्यापुर्वीच प्रतिबंधात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे.

कार्यक्षेत्रातील आशा सेविका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सहाय्यक यांचे पथक गावोगावी गृहभेटी करून स्थलांतरीत होऊन परत आलेल्या रुग्ण व गावातील



संशयीत ताप रुग्णांचे रक्त नमुने, नियमित कीटकशास्त्रीय सर्वेक्षण, तात्पुरत्या डासोत्पत्ती स्थानांमध्ये डी लार्वा टाकणे, कोरडा दिवस पाळणे, कीटकजन्य आजाराविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण करणे व ग्रामपंचायत भेटी करून मिशन मोडवर कारवाई सुरू केली आहे. सालेकसा तालुक्यातील एकट्या प्राथमिक आरोग्य केंद दरेकसा अंतर्गत ४४ गावांवर आरोग्य विभागाची करडी नजर राहणार असून, त्याची पावसाळ्यापुर्वी प्रतिबंधासाठी सुरुवात पिपरिया येथुन सुरू करण्यात आली आहे. सर्व गावात कीटकजन्य आजार प्रतिबंधात्मक कार्यवाही करणार आहे. २३ मे रोजी दिवशी एकाच वेळी २० आशा सेविका, ४ आरोग्य सेविका, ५ आरोग्य सेवक व ३ आरोग्य सहायक यांच्या पथकामार्फत प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली. त्यात ११०३ आरडीकेद्वारा १४४० लोकांची हिवताप विषयक रक्त तपासणी करण्यात आली. साचलेल्या पाण्यात डीलार्वामाफ ́त डास अळी नियत्रंण कार्यवाही करण्यात आली. कीटकजन्य आजाराकरिता सालेकसा व आमगाव तालुक्यातील २ कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ नागपुरे व बिसेन यांच्याद्वारा डास संशोधन व जनजागरण करण्यात आले.

### अतिसंवेदनशील गावांमध्ये प्रतिबंधात्मक कारवाई

जिल्ह्यात हिवतापाकरीता अतिसंवेदनशील सर्व १३८ गावांमध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे नियोजन पूर्ण करण्यात आले असून, त्यावर प्रत्यक्ष प्रतिबंधात्मक कारवाई तालुका आरोग्य अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक यांच्या देखरेखी खाली नियोजनबद्ध सुरू आहे. सालेकसा तालुक्यातील तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल आत्राम, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस गिरी, डॉ. प्रभाकर डॉगस्वार यांच्या विशेष मार्गदर्शनात व हिवताप विभागाचे जिल्हास्तरीय आरोग्य पर्यवेक्षक नंदकिशोर भालेराव यांच्या नेतृत्वात ठाकूर, खापर्डे, गणवीर, दिपेश चौहान, देखमुख, दिपेवड, जायभाये, मसराम व आरोग्य सेविका हेमलता पुंडे, सय्याम सोबत एम्बेड केंद्रशासित एनजिओचे हिमानी यादव यांनी प्रतिबंधात्मक कारवाई पूर्ण केली.

# बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर मजुरांची नोंदणी!



**गोंदिया :** मागील काही वर्षांपासून असंघटीत क्षेत्रातील कामगारांना लाभदेण्यासाठी शासनाच्या वतीने अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. या योजनांवा बऱ्याच प्रमाणात कामगार व त्यांच्या पाल्यांना लाभ देखील मिळत आहे. परंतु, लाभासाठी अनेक जण बांधकाम कामगार झाल्याचे चित्र आहे. लाभ मिळत असल्याने जे बांधकाम कामगार नाहीत, असेही अर्ज करून योजनांचा लाभ घेत आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात दलाल सक्रिय झाले असून बोगस प्रमाणपत्रतयार करून अनेकांना बांधकाम कामगार बनविले जात आहे. या प्रकारामुळे खरे कामगार योजनांपासून दूर राहत आहेत. बोगस कामगार मोठ्या प्रमाणात लाभ घेत

आहेत. या प्रकाराची चौकशी करून दलालांवर लगाम लावण्याची मागणी केली जात आहे.

कामगार कल्याण महामंडळातर्फे देण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी बांधकाम कामगार मजुरांना कामगार असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असते. तेव्हाच योजनेचा लाभ दिला जातो. यात आर्थिक लाभाच्या योजना असल्याने अनेक उच्चभ्रू परिवारातील महिला, पुरुष व तरुणांनी एकही दिवस कामावर गेले नसताना दलालामार्फत अधिकचे पैसे देऊन बांधकाम मजुराचे बोगस प्रमाणपत्र मिळवीत आहेत. बोगस प्रमाणपत्राच्या आधारे बांधकाम मजुरांची नोंदणी केली जात आहे. नोंदणीच्या आधारे अनेक आर्थिक लाभाच्या योजनांचा लाभ घेऊन

शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासण्याचे काम केले जात आहे. परिणामी पात्र बांधकाम कामगार लाभार्थी योजनेपासून वंचित राहत असल्याने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. या प्रकाराची गांभीर्याने चौकशी केल्यास मोठे घबाड बाहेर येण्याची शक्यता आहे.

प्रमाणपत्र असणे आवश्यक

बांधकाम कामगार म्हणून नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये एखाद्या कंत्राटदारांकडे किंवा कामाच्या इतर ठिकाणी वर्षभरात कमीत कमी २० दिवस काम केले असल्याचे प्रमाणपत्र वग्रामपंचायत, नगर परिषद किंवा महानगरपालिकेचे बांधकाम कामगार असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. मात्र, सद्यः स्थितीत ग्रामपंचायतीच्या सचिवाकडून प्रमाणपत्र देणे बंद आहे. अशा स्थितीत एकही दिवस कामावर न गेलेल्या उच्चभ्रू परिवारातील लोकांनी आर्थिक लाभाच्या योजनेसाठी दलालामार्फत बनावट प्रमाणपत्र जोडून बांधकाम कामगार म्हणून नोंदणी केली व अनेक योजनांचा लाभ घेत आहेत. त्यामुळे मागील वर्षभरात नोंदणी केलेल्या बांधकाम कामगारांनी नोंदणीसाठी जोडलेल्या कागदपत्रांची जिल्हा स्तरावरून चौकशी केल्यास अनेक बोगस बांधकाम कामगार मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

एवढे बांधकाम कामगार आले कुठून?

कामगार कल्याण महामंडळातर्फे योजनांचा लाभ घेण्यासाठी असंघटीत क्षेत्रातील कामगार असणे आवश्यक आहे. त्यासाठी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र लागते. परंतु, कंत्राटदाराकडे कामगार एकही दिवस बांधकामावर नसतानाही अनेक कंत्राटदारांनी आर्थिक लोभापायी बांधकाम कामगाराच्या फॉर्मवर स्वाक्षरी दिलेल्या आहेत. नोंदणी केलेल्या बांधकाम कामगाराच्या फॉर्मची तपासणी करून स्वाक्षरी असलेल्या कंत्राटदाराच्या कामावरील मस्टरची चौकशी केल्यास अनेक कंत्राटदारसुद्धा अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# जिल्ह्यात फक्त तीनच ठिकाणी वीजरोधक यंत्र



**गोंदिया :** जिल्ह्यात वीज पडून दरवर्षी कित्येकांचा जीव जातो.मागील पाच वर्षात तब्बल ३३ जणांचा वीज पडून मृत्यू झाला आहे. अशात वीजरोधक यंत्र बसविणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र, असे असतानाही आमगाव तालुक्यातील अंजोरा,गोंदिया तालुक्यातील काटी येथे तसेच अर्जुनी-मोरगाव तालुक्यातील तहसील कार्यालयात असे एकूण तीन वीजरोधक यंत्र बसविण्यात आले आहे.

## वर्षनिहाय वीज पडून मृतांचा तक्ता

| वर्ष | मृत्यूचा महिना |
|---|---|
| २०२० | जून-१, जुलै-५, ऑगस्ट-२, सप्टेंबर-१ |
| २०२१ | मे-२, जून-४, सप्टेंबर-१, ऑक्टोबर-१ |
| २०२२ | मे-२, जून-४, जुलै-१ |
| २०२३ | मे-१, जुलै-४ |
| २०२४ | जून-२, जुलै-२ |
| २०२५ | एप्रिल-१ |

तीन तालुक्यांत प्रत्येकी एका ठिकाणी हे यंत्र बसविण्यात आले आहे. प्रत्येक तालुक्यात वीजरोधक यंत्र बसविण्यात यावे, असा प्रस्ताव टाकण्यात आला असतानाही अद्याप उर्वरित तालुक्यांत वीजरोधक यंत्र बसविण्यात आलेले नाही. मान्सूनपूर्व आणि मान्सूनच्या सुरुवातीच्या कालखंडात विशेषतः माहे मे, जून व जुलै तसेच मान्सून पश्चात साधारणतः माहे ऑक्टोबर या महिन्यात राज्यात अनेक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह पूर्वमोसमी पाऊस हजेरी लावतो. मान्सून दाखल झाल्यावर साधारणतः पहिल्या पावसात शहरी भागाबरोबरच विशेषकरून ग्रामीण भागात वीज कोसळून अनेक शेतकरी व नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. जिल्ह्यातही वीज पडून दुर्घटना होत असतात. वीज पडण्याच्या घटनेतील जीवितहानी कमी करण्यासाठी किंबहुना टाळण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुरू आहेतच.

पावसाळ्याची सुरुवात ही नेहमीच वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह असते.अशात वीजरोधक यंत्र बसविल्यास त्या परिसरात वीज पडण्याची घटना टाळून जीवितहानी टाळता येऊ शकते.यातूनच वीजरोधक यंत्र बसविणे गरजेचे आहे. मात्र, जिल्ह्यात सध्यातरी तीनच ठिकाणी वीजरोधक यंत्र बसविण्यात आले आहे.

## सर्वच तालुक्यांत प्रस्तावित

**जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालयात वीजरोधक यंत्र बसविणे प्रस्तावित असून असे एकूण १२ ठिकाण प्रस्तावित होते. यातील अर्जुनी-मोरगाव येथील तहसील कार्यालयात यंत्र बसविले असून आता ९ ठिकाण उरले आहेत. या ठिकाणांवर यंत्र बसविणे गरजेचे आहे.**

## २ किमी परिसरात वीज पडत नाही

**पावसाळ्याच्या दिवसात वीज पडण्याचे प्रमाण मोठे असते. वीजरोधक असलेल्या ठिकाणापासून २ किमीच्या आत वीज पडत नाही. त्यासाठी वीजरोधक बसविणे आवश्यक आहे.**

**विजा चमकत असताना आपण बाहेर असाल तर पायाव्यतिरिक्त शरीराचा कुठलाही भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. शेतात अथवा तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी तत्काळ कोरड्या व सुरक्षित ठिकाणी जावे.**

**राजन चौबे,**
**आपत्ती व्यवस्थापन अधिकारी गोंदिया.**

# आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची उणीव




**अर्जुनी मोरगाव :** आरोग्य सेवा सहज उपलब्ध होण्याच्या हेतूने शासन स्तरावरून कल्याणकारी उपक्रम राबविण्याचा गवगवा मोठ्या प्रमाणात केला जातो. तालुक्यात सर्वत्र आरोग्य यंत्रणा मोठ्या प्रमाणात पसरली असली तरी मात्र आजघडीला गाव पातळीवरील आरोग्य केंद्रात मनुष्यबळाचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. नाईलाजास्तव सामान्य जनता आरोग्य सेवेपासून वंचित राहत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

तालुक्यात दोन ग्रामीण रुग्णालये, सात प्राथमिक आरोग्य केंद्रे, एक अंग्लो दवाखाना, तीन आयुर्वेदिक दवाखाने तसेच गावस्तरावर ४३ आरोग्य उपकेंद्रे कार्यरत आहेत. सर्वसामान्य जनतेला तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी तालुक्यातील ग्रामीण भागात सुसज्ज अशा इमारतीत आरोग्य केंद्र तत्पर असल्याचे दिसून येत आहे. सामान्य जणांना आरोग्य सेवेच्या मोबदल्यात पैसे लागणार नाही यासाठी आता रुग्ण नोंदणी सुद्धा मोफत केली जाते. असे असले तरी तालुक्यातील आरोग्य विभागात मनुष्यबळाचा अभाव बऱ्याच ठिकाणी असल्याचे जाणवत आहे. प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभावाने कित्येकदा रेफर टू गोंदिया-भंडारा असे धोरण अंगीकारले जात असल्याची ओरड ग्रामीण भागातील जनता करीत आहे.

आदिवासी तसेच नक्षलग्रस्त तालुका असलेल्या ठिकाणी सध्या आरोग्यसेवा खुद्द सलाईनवरच असल्याचे दिसून येत आहे. बऱ्याच प्राथमिक आरोग्य केंद्रात सामान्य जनतेच्या सेवेसाठी डॉक्टरच उपलब्ध राहत नाही असा नित्याचाच प्रकार असल्याचे बोलले जाते. बदलत्या हवामानानुसार सामान्य जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून, त्यावर इलाज करणाऱ्या मनुष्यबळाची उणीव मात्र जाणवत आहे.

**अनेक कर्मचाऱ्यांची कमतरता**

तालुक्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात आरोग्य यंत्रणा कार्यरत असल्याचे चित्र दिसत असले तरी आरोग्य यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी मनुष्यबळाचा अभाव बऱ्याच ठिकाणी दिसून येत आहे. तालुक्यातील ११ आरोग्य कर्मचा-यांचे प्रशासकीय सबबीखाली इतरत्र स्थानांतरण झाल्याची माहिती मिळाली.

आजघडीला तालुक्यात आरोग्य सेवकांचे सात पद, आरोग्य सेविकांचे २५ पद, प्रयोगशाळा तंत्रज्ञ दोन पद त्याचप्रमाणे कंत्राटी आरोग्य सेविकांचे पद सुद्धा रिक्त असल्याचे सांगण्यात येते. पुरेसा कर्मचारी वर्ग आरोग्य यंत्रणेत कार्यरत नसल्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य जनता शासनाच्या आरोग्य सेवेपासून वंचित राहत आहे. नाईलाजास्तव गरजू लाभार्थ्यांना महागडी खाजगी आरोग्यसेवा घ्यावी लागत आहे.

# भंडारा जिल्ह्यातील अनिकेत नगरकर यांची मुख्यमंत्री फेलोशिपसाठी निवड

**भंडारा** -जिल्ह्यातील अनिकेत नगरकर यांची महाराष्ट्र शासनाच्या प्रतिष्ठित मुख्यमंत्री फेलोशिप योजनेसाठी निवड झाली आहे. ही फेलोशिप राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये थेट काम करण्याची संधी देत असून, तरुण नेतृत्वाला प्रशासनाच्या जवळून अनुभवाची आणि सामाजिक परिवर्तनात योगदान देण्याची संधी मिळते.अनिकेत नगरकर यांनी दिल्लीतील डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठातून डेव्हलपमेंट स्टडीज या विषयात पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे. शालेय जीवनापासूनच सामाजिक कार्याची आवड असलेल्या अनिकेत यांनी स्वप्नपूर्ती फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेसोबत कार्य सुरू केले.

# जयस्तंभ चौकातील बसस्थानकाचे होणार आधुनिकीकरण

## १ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर : विनोद अग्रवाल यांची माहिती

**गोंदिया :** शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले जयस्तंभ चौकातील बसस्थानक अनेक वर्षापासून दुर्लक्षित होते. जुने बसस्थानक जीर्ण झाले असून, त्याठिकाणी प्रवाशांना बसणे कठीण झाले होते. आता ही अडचण कायमची दूर होणार असून, जयस्तंभ चौकातील बसस्थानकाचे आधुनिकीकरण केले जाणार आहे. त्याला शासनाने मंजुरी दिली असून, यासाठी १ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती आ. विनोद अग्रवाल यांनी दिली.

जयस्तंभ चौकातील बसस्थानकाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षापासूनची समस्या मार्गी लागणार आहे. जयस्तंभचौकात बसस्थानक आहे. मात्र या बसस्थानकाला गुरांच्या गोठ्याचे स्वरूप आले होते. बसस्थानक परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य असल्याने प्रवाशांना त्याठिकाणी बसणे कठीण झाले होते. त्यामुळे याठिकाणी नवीन बसस्थानक उभारण्याची मागणी केली जात होती.

त्याचीच दखल घेत आ. विनोद अग्रवाल यांनी शासनाकडे पाठपुरावा करून येथे आधुनिक स्वरूपाचे बसस्थानक उभारण्यासाठी १ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे.

यामुळे प्रवाशांची अनेक दिवसांची समस्या मार्गी लागली आहे. नवीन बसस्थानक अत्याधुनिक वास्तुविशारद संकल्पनेसह आणि सर्व नागरी सुविधा असलेल्या स्वरूपात बांधले जाणार आहे.




- **नवीन बसस्थानकात या असणार सोयीसुविधा**
- **स्वच्छ व सुंदर प्रतीक्षालय**
- **महिलांसाठी, पुरुषांसाठी व दिव्यांगांसाठी स्वतंत्र स्वच्छ व सुसज्ज शौचालय**
- **शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा**
- **डिजिटल माहिती फलक**
- **प्रकाश व्यवस्था आणि हरित सौंदर्यीकरण**
- **सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा यंत्रणा**



**लवकरच बसस्थानकाच्या कामाला सुरुवात**

**गोंदिया शहरात आधुनिक स्वरूपाचे बसस्थानक उभारण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांची अनेक दिवसांपासूनची समस्या कायमची मार्गी लागणार आहे. लवकरच या बसस्थानकाच्या कामाला सुरुवात होईल.**

**विनोद अग्रवाल, आमदार**

# रीवा-पुणे एक्सप्रेस धावणार आता आठवड्यातून एक दिवस



**गोंदिया :** केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव यांनी आठवडाभरापूर्वी रिवा-पुणे-रिवा, जबलपूर-रायपूर व भोपाळ-बंगळूर या तीन रेल्वे गाड्या लवकरच सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर रीवा-पुणे-रिवा या रेल्वे गाडीचे संभाव्य वेळापत्रक रेल्वे विभागाने जाहीर केले आहे. ही गाडी आठवड्यातून एक दिवस (दर मंगळवारी) धावणार आहे. यामुळे महाराष्ट्रासह मध्यप्रदेशातील प्रवाशांना सुद्धा मोठा दिलासा मिळाला आहे.

हावडा-मुंबई मार्गावरील गोंदिया रेल्वे स्थानक हे महत्त्वपूर्ण स्थानक म्हणून ओळखले जाते. या रेल्वे स्थानकावरून दोन्ही दिशेला ४९ वर मेल, एक्सप्रेस, लोकल, पॅसेंजर गाड्या धावतात. तर दररोज दहा हजारांवर प्रवासी गोंदिया रेल्वे स्थानकावरून प्रवास करतात. हे रेल्वे स्थानक मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्याला लागून असल्याने प्रवाशांना सुद्धा या रेल्वे स्थानकाची मदत होते. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव यांनी गेल्या आठवड्यात या मार्गावर तीन रेल्वे गाड्या सुरू करण्याची घोषणा केली

होती. त्यापैकी रिवा-पुणे-रिवा या रेल्वे गाडीचे संभाव्य वेळापत्रक रेल्वे विभागाने जारी केले आहे. त्यानुसार रिवा-पुणे-रिवा या गाडीला २०१५२ व २०१५१ हा क्रमांक दिला आहे. ही गाडी दर मंगळवारी सकाळी ६:४५ वाजता रिवा रेल्वे स्थानकावरून पुणेसाठी सुटेल. यानंतर सकाळी ७:३८ वाजता सतना, मैहर ८:१७, कटनी ९:२५ बजे, जबलपूर सकाळी ११:०४ वाजता, मदनमहल सकाळी ११:०७, नैनपूर दुपारी १:३४ वाजता, बालाघाट दुपारी ३:१५ वाजता, गोंदिया दुपारी ४:०१ वाजता, नागपूर सायंकाळी ६:२० वाजता व पुणे येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ९:४५ वाजता पोहचेल.

त्यानंतर हीच गाडी पुणे येथून बुधवारी दुपारी ३:१५ वाजता रिवासाठी रवाना होईल. गुरुवारी पहाटे ५:२५ वाजता नागपूर, गोंदिया सकाळी ७:४५ वाजता, बालाघाट ८:४६ वाजता, नैनपूर १०:१८ वाजता, मदनमहल दुपारी १२:४३ वाजता, जबलपूर दुपारी १२:४७ वाजता, कटनी दुपारी २:३५ वाजता, मैहर दुपारी ३:५० वाजता, सतना ४:३२ वाजता व रीवा येथे सायंकाळी ५:३० वाजता पोहचेल.

# मुरव्यमंत्री देवेंद्र फडणवीस छत्तीसगड सीमेवरील दुर्गम कवंडे गावात



**गडचिरोली :-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज थेट महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील कवंडे गावात पोहोचले. या अतिदुर्गम आणि नक्षलप्रभावित भागात जाणारे ते राज्याचे पहिले मुख्यमंत्री ठरले.तेलंगणा सीमेलगतच्या अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त कवंडे भागात आयोजित लाभार्थी मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट जनतेशी संवाद साधला, ते म्हणाले की, गडचिरोलीला नक्षलमुक्त व औद्योगिकदृष्ट्या सक्षम जिल्हा बनवण्याचा आमचा निर्धार आहे.

शासन आणि प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून नक्षलग्रस्त भागात परिवर्तनाचे वारे वाहू लागले असून, शासनाच्या सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचत असल्यामुळे लोकांमध्ये शासनाबाबतचा विश्वास वाढला आहे.

हीच खरी लोकाभिमुख विकास प्रक्रिया आहे. कवंडे, नेलगुंडा आणि पेनगुंडा या ठिकाणी नुकतीच ङ्गधरती आबाफ अभियानांतर्गत शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये एकूण ५३३ लाभार्थ्यांना विविध योजनांचे ९८७ लाभ वितरित करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, अन्न सुरक्षा योजना, पीएम किसान सन्मान निधी, ङ्गमनरेगाफ जॉब कार्ड, स्क्रिनिंग व अ?ॅनिमिया तपासणी, आधार अद्ययावत करणे, जात प्रमाणपत्र आदी योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. महसूल, आरोग्य, कृषी, सामाजिक न्याय, पंचायत राज, महिला व बालकल्याण, वन विभाग, पोलिस आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या अधिकारी व कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले होते.

# सालेकसा-नानव्हा मार्ग सहा महिन्यांत बनवण्याचे काय झाले



**सालेकसा :** सालेकसा ते नानव्हा क्रमांक ७४ मार्गाचे नविनीकरण तसेच याच मार्गावरील कुआढास नाल्यावर नवीन पुलासाठी तातडीने निधी मंजूर करण्यात यावा, अन्यथा येत्या विधानसभा निवडणुकीत संपूर्ण गाव बहिष्कार घालणार, असा पवित्रा मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये घेऊन सर्व गावकऱ्यांनी एकमताने तसा ठरावसुद्धा पारीत केला होता. गावकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहून उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड यांनी गावाला भेट देऊन आश्वासन दिले होते. तसेच निवडून आल्यानंतर सहा महिन्यांत रस्ता तयार करून देणार, असे आश्वासन आमदार संजय पुराम यांनी निवडणुकीच्या आधी दिले होते. त्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवत गावकऱ्यांनी सभा घेऊन विधानसभा निवडणुकीवरील बहिष्कार मागे घेतला होता. परंतु, आता निवडणुका होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होऊनही नानव्हा सालेकसा रस्ता तयार करण्यासाठी कोणत्याही हालचाली सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे गावकऱ्यांचा भ्रमनिरास झाला आहे.

तालुक्यातील नानव्हा, बिंझली व खोलगड परिसरातील जवळपास १५ गावांतील लोक नानव्हा-सालेकसा मार्गावरून आपल्या दैनंदिन कामासाठी सालेकसा मुख्यालयी ये-जा करतात. परंतु, गडमाता मंदिर पहाडाच्या पायथ्याजवळून गेलेला सालेकसा-नानव्हा-घोंसी मार्ग पूर्णतः खड्ड्यात हरवला असून, त्यावरून चालणेसुद्धा जिवावर येते. याच मार्गावरील कुआढास नाल्यावरील पुलाची उंची फारच कमी असल्यामुळे तसेच पूल धोकादायक झाल्याने सतत अपघात होत असतात. मागील १० वर्षात पावसाळ्यात पूल ओलांडताना काही लोकांनी आपला जीवसुद्धा गमावला आहे. ही बाब प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या अनेकवेळा निदर्शनास आणून दिली असतानाही सपशेल दुर्लक्ष केले जाते. मागील प्रत्येक निवडणुकीत सर्वच पक्षांच्या नेत्यांनी आश्वासन दिले. परंतु, नंतर त्यांना याचा विसर पडला. दरम्यान, मागील १० वर्षात खासदार बदलले, आमदार बदलले आणि जि. प. सदस्यही बदलले. परंतु, समस्या मजैसे थेफ्र असल्याने आता कोणावर विश्वास ठेवायचा? असा प्रश्न पडला आहे.

त्यामुळे शेवटी लोकांनी मागील निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा ठाम निर्णय घेतलेला होता. सरपंच गौरीशंकर बिसेन यांच्या नेतृत्वात सर्व गावकऱ्यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे निवेदन जिल्हाधिकारी प्रजित नायर तसेच सर्व लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे मंत्री तसेच संबंधित विभागाच्या कार्यालयांनाही दिले होते. हे निवेदन देताना राजेश कटरे व विनोद पटले यांच्यासह सर्व पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते. बहिष्काराचे पत्र स्वीकारून जिल्हाधिकारी नायर यांनी एसडीएम कविता गायकवाड यांना नानव्हा गावाला भेट देऊन समस्या जाणून घेण्यास सांगितले होते. गायकवाड यांनी स्वतः दुचाकी चालवत

गावाला भेट देत गावकऱ्यांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले व निवडणुकीनंतर मागणीला प्राधान्य देण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर गावातील लोकांनी लेखी आश्वासन मागितले असता, एसडीएम यांच्यावतीने तहसीलदार नरसय्या कोंडागुर्ले यांनी गावाला भेट देऊन सरपंच बिसेन यांच्याकडे आश्वासन पत्र दिले. यानंतर गावकऱ्यांनी बहिष्कार मागे घेतला. निवडणुकीदरम्यान संजय पुराम यांनी गावाला भेट देत निवडणूक झाल्यावर अगदी सहा महिन्यांत नानव्हा सालेकसा रस्ता तयार करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.

परंतु, निवडणूक झाल्यानंतर आठ महिने लोटले आणि आता पावसाळा सुरू झाला आहे. तरीही रस्ता बांधण्याची कोणतीच कार्यवाही होताना दिसत नाही. त्यामुळे परिसरातील लोकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे

## जाहीरनामा

प्रस्तुत जाहीरनाम्या द्वारे सर्व आम जनतेला सुचित करण्यात येते की **अर्जदार सोहनलाल नामाजी गौतम रा. सुर्याटोला, गोंदिया ता. जि. गोंदिया** यांनी त्यांचे आत्या **नामे जाननबाई उर्फ भागरताबाई लक्ष्मीचंद रिनाईत** यांचा मृत्यु मौजा नगर परिषद गोंदिया ता. जि.गोंदिया येथे दि.१२/१०/१९९६ रोजी झालेली असून सदर मृत्यूची नोंद नगर परिषद गोंदिया ता.जि.गोंदिया याठिकाणी नोंदविण्यात आलेली नाही. सदर मृत्यूची नोंदणी न झाल्याने अर्जदार यांना शासकीय कामाकरीता अडचण निर्माण होत असून सदरहू मृत्युची नोंद नगर परिषद गोंदिया येथे घेण्याकरीता आदेश मिळणेबाबत मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत दि.२७/०५/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे.

सबब अर्जदार **सोहनलाल नामाजी गौतम** ता.जि.गोंदिया यांच्या आत्या **नामे जाननबाई उर्फ भागरताबाई लक्ष्मीचंद रिनाईत** यांच्या मृत्युची नोंद नगर परिषद गोंदिया येथे करण्याचे संबधात कोणाचेही दावे/हरकती किंवा हितसंबध असल्यास त्यांनी आपले दावे/हरकती अर्ज दिनांक १३/०६/२०२५च्या आत लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे.तदनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेप/हरकतींचा विचार केला जाणार नाही,याची कृपया नोंद घ्यावी.

**विजया झाडे**
**नायब तहसिलदार**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय**
**गोंदिया**

## जाहीरनामा

प्रस्तुत जाहीरनाम्या द्वारे सर्व आम जनतेला सुचित करण्यात येते की अर्जदार **सोहनलाल नामाजी गौतम रा. सुर्याटोला,** गोंदिया ता. जि. गोंदिया यांनी त्यांचे काका नामे. **मानिकनचंद बैरागी गौतम** यांचा मृत्यु मौजा सुर्याटोला ता. जि.गोंदिया येथे दि.२०/०४/२०२१ रोजी झालेली असून सदर मृत्यूची नोंद नगर परिषद गोंदिया ता.जि.गोंदिया याठिकाणी नोंदविण्यात आलेली नाही. सदर मृत्युची नोंदणी न झाल्याने अर्जदार यांना शासकीय कामाकरीता अडचण निर्माण होत असून सदरहू मृत्युची नोंद नगर परिषद गोंदिया येथे घेण्याकरीता आदेश मिळणेबाबत मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत दि.२७/०५/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे.

सबब **अर्जदार सोहनलाल नामाजी गौतम** ता.जि.गोंदिया यांच्या का**का नामे मानिकचंद बैरागी गौतम** यांचे मृत्युची नोंद नगर परिषद गोंदिया येथे करण्याचे संबधात कोणाचेही दावे/हरकती किंवा हितसंबध असल्यास त्यांनी आपले दावे/हरकती अर्ज दिनांक ११/०६/२०२५च्या आत लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे.तदनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेप/हरकतींचा विचार केला जाणार नाही,याची कृपया नोंद घ्यावी.

**विजया झाडे**
**नायब तहसिलदार**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय**
**गोंदिया**

# मोबाईल हिसकावल्याने जिल्हा नियोजन बैठकीत खासदार-पालकमंत्र्यांमध्ये बाचाबाची

**भंडारा :–** भंडारा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सत्ताधारी व विरोधी आमदारांमध्ये जोरदार खडाजंगी झाल्याचे पाहावयास मिळाले. खा. डॉ. प्रशांत पडोळे यांच्या सोशल मिडिया हॅण्डलरचा मोबाईल हिसकाविल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. यावरुन खा. डॉ. प्रशांत पडोळे व पालकमंत्री संजय सावकारे यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाल्याची माहिती पुढे येत आहे. यावरुन जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत राडा झाल्याने काही काळ सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दि. ८ जून २०२५ रोजी भंडारा जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या




बेठकीला पालकमंत्री संजय सावकारे उपस्थित होते. काही विषयांना घेऊन खा. डॉ. प्रशांत पडोळे व पालकमंत्री यांच्यात विकास निधीवरुन बाचाबाची होत असतांना खा. डॉ. प्रशांत पडोळे यांच्या सोशल मिडिया चालविर्णा ?या हॅण्डरने व्हिडिओ घेतला. ही बाब पालकमंत्र्यांच्या लक्षात येताच सोशल मिडिया चालविर्णा ?या हॅण्डरचा मोबाईल हिसकावून त्याला सभागृहाबाहेर पाठविले. यावेळी सभागृहात आमदार, खासदार व पालकमंत्र्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाल्याची खमंग चर्चा आता होऊ लागलेली आहे.

यावेळी आ. नरेंद्र भोंडेकर यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा मुद्दा मांडला. त्यावर शासकीय महाविद्यालयाचा कामाला गती देण्यासाठी लवकरच बैठक लावण्यात येईल, असे पालकमंत्री सावकारे यांनी सांगितले. जिल्ह्यात एप्रिल, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीदरम्यान झालेल्या धानपिकाचे नुकसान व पंचनाम्याबाबत उपस्थित लोकप्रतिनिधींनी मुद्दा उपस्थित केला असता जिल्ह्यात सर्वसाधारण अकराशे हेक्टरवर नुकसान झाल्याची माहिती कृषि विभागाकडून देण्यात आली.

तसेच जिल्ह्यात २३६ धान खरेदी केंद्र सुरु असल्याची माहिती पणन विभागाने दिली. यावेळी तुमसर व मोहाडी येथील तालुका क्रिडांगणाचे काम तातडीने करण्याच्या सूचना पालकमंत्री सावकारे यांनी दिल्यात. मात्र आज झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खासदार व पालकमंत्र्यांमध्ये झालेल्या शाब्दिक बाचाबाची प्रकरणाची खमंग चर्चा केली जात आहे.

# स्वतंत्र विदर्भ राज्य आम्ही घेणारच; विदर्भ आंदोलन समितीची हुंकार

**गोंदिया :–** छत्तीसगढ,उत्तरांचल व झारखंड हे तीन राज्याची निर्मिती करण्यात आली. परंतु, महाराष्ट्रातील राजकारणामुळे विदर्भ राज्याच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. भाजपने सन २०१४ मध्ये विदर्भ राज्याच्या नावाखाली मते मागितली. मात्र आता दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला आहे. सातत्याने विदर्भराज्य आंदोलन समितीकडे स्वतंत्र विदर्भाची मागणी केली जात आहे. परंतु, सत्ताधारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे (ता.७) भंडारा आयोजित असलेल्या मेळाव्यात सर्व पदाधिकाऱ्यांनी हुंकार भरून स्वतंत्र विदर्भ राज्य घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार केला आहे.

भंडारा येथे स्वतंत्र विदर्भराज्य आंदोलन समितीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ॲड. वामनराव चटप तर उदघाटक म्हणून लोकनेते तथा किसान



बिग्रेडचे प्रमुख प्रकाश पोहरे, त्याचबरोबर मार्गदर्शक म्हणून महिला आघाडी अध्यक्षा रंजना मामर्डे, प्रा. प्रभाकर कोडबत्तुनवार, माजी राज्यमंत्री रमेश गजबे,

मुकेश मासुरकर, ॲड. सुरेश वानखेडे, काकासाहेब मते, अहमद कादर, नासीर जुम्मन शेख आदि मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी चळवळीच्या कार्यकर्त्यांना विदर्भघेतल्याशिवाय स्वतंत्र बसणार नाही, असा हुंकार भरला. या मेळाव्यात गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, नागपूर येथील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्रामुख्याने गोंदिया जिल्ह्यातील अतुल सतदेवे, वसंत गवळी, भोजराज ठाकरे, सी.पी. बिसेन, छैलबिहारी अग्रवाल, सुंदरलाल लिल्हारे, पंचशिला पानतवणे, दिपा काशिवार, प्रशांत नखाते, नरेश निमजे, ज्योती खांडेकर, गणेश शर्मा, खुणे पाटील, वजीर बिसेन, भुपेंद्र पटले, रमेश बिसेन, बंडू वैद्य, अरूण बन्नाटे, यशवंत रामटेके, ज्ञानेंद्र आगासे, भगवान जंगाळ, ॲड. पी. एन. टेंभुर्णीकर, आय. एच. मेश्राम, सौरभ भांडारकर, भाऊराव बन्सोड, रामचंद्र रोकडे, नेपाल मारगाये, दुर्वास धार्मिक, संजय नवखरे, रमेश वळके, किशोर सोनवाने, प्रमोद जिभकाटे, अमित हुमणे, दुर्योधन वैद्य, दीपाली सेलुकर, डॉ निरज खोब्रागडे आदि उपस्थित होते.

# सडक अर्जुनी एमआयडीसीचा मार्ग मोकळा होणार



**कोहमारा नवेगाव:–** नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे नव्याने सीमांकन होणार असल्याने इको सेन्सिटिव्ह झोनमुळे रखडलेल्या बहुप्रतीक्षित सडक अर्जुनी एमआयडीसीचा मार्ग आता मोकळा होणार आहे. राज्याच्या सर्व भागांचे सारख्या प्रमाणात औद्योगकीकरण व्हावे. पुणे, मुंबईसारख्या औद्योगिक पट्ट्यातील उद्योग समुहापासून उद्योगाचे विविकरण व्हावे, असा एमआयडीसी स्थापन करण्यामागील दुहेरी उद्देश आहे. व्याघ्र प्रकल्प घोषित झाल्यानंतर इको सेन्सिटिव्ह म्हणून झोनचा भाग मोठ्या प्रमाणात क्षेत्र निश्चित आले करण्यात होते.

सडक अर्जुनी तालुक्याची संपूर्ण अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. शेतीव्यतिरिक्त अन्य कोणताही उद्योग, व्यवसाय नसल्याने सडक अर्जुनी तालुक्याची निर्मिती झाल्यापासूनच या तालुक्यात एमआयडीसी स्थापन करावी, अशी येथील जनतेची मागणी होती. त्या दृष्टीने लोकप्रतिनिधिनी प्रयत्नही सुरू केले होते. नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प घोषित झाल्यानंतर इको सेन्सिटिव्ह झोनचा भाग म्हणून खूपच मोठ्या प्रमाणावर क्षेत्र निश्चित करण्यात आले होते.

यात सडक अर्जुनी तालुक्याचा बराच भाग या प्रकल्पात व बफर क्षेत्रात मोडत असल्याने काही भाग वगळता संपूर्ण तालुका इको सेन्सिटिव्ह झोन म्हणून घोषित करण्यात आला होता. परिणामी येथील पायाभूत विकासकामावर अनेक बंधने आली. ₹रस्ते, वीजपुरवठा यांसारख्या अनेक पायाभूत विकासकामांबरोबरच एमआयडीसी स्थापन करण्याचा तिढा निर्माण झाला होता. ही बाब वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. यानंतर आता शासनाने त्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली अहे.

**इको सेन्सिटिव्ह झोनने निर्माण झाली होती अडचण**

नव्याने सीमांकन झाल्यानंतर सडक अर्जुनी येथे एमआयडीसी स्थापन करण्यासाठी युध्दपातळीवर पाठपुरावा करण्याची गरज आहे. आ. राजकुमार बडोले हे या क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करीत असल्याने त्यांनी हा मुद्दा आता लावून धरण्याची गरज आहे. विशेष म्हणजे तेसुध्दा यासाठी सुरुवातीपासूनच आग्रही होते. पण, तालुका इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये येत असल्याने त्यात अनेक अडचणी निर्माण होत होत्या. पण, आता नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे नव्याने सीमांकन होणार असल्याने व इको सेन्सिटिव्ह झोनचे अंतर कमी होऊन पायाभूत सुविधांसाठी मार्ग मोकळा होण्यास मदत होईल.

# आमदार राजकुमार बडोले यांची नुकसानग्रस्त भागाला भेट



**सडक अर्जुनी::–** मागील आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे सडक अर्जुनी तालुक्यात घरांचे व शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी आज धानोरी व टेमनी या गावांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणी दरम्यान आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोलेनी नुकसानग्रस्त नागरिकांशी संवाद साधून समस्या जाणून घेतल्या व तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. नुकसान भरपाई तात्काळ देण्याबाबत सबंधित अधिकाऱ्यांना सुचना केल्या. तसेच महावितरणच्या अडचणी आणि इतर समस्यांचे निराकरणही करण्यात आले.

यावेळी समवेत पंचायत समिती सभापती चेतन वळगाये, उपसभापती निशा काशिवार, जि.प. सदस्या सुधा रहांगडाले, माजी सभापती संगीता खोब्रागडे, कृ.ऊ.बा.स. सभापती अविनाश काशिवार, डि.यु. रहांगडाले, सरपंच चेतन पटले , सरपंच वासनिक, मंडळाध्यक्ष विलास बागडकर, गौरेश बावनकर, मनोहर काशिवार, तुकाराम ठाकरे, तेजराम खोब्रागडे, महेश पटले, नायब तहसीलदार जांभुळकर, मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.पी.के.पटले गोंदियाचे नवे जिल्हा शल्यचिकित्सक

**गोंदिया:–** जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. अमरिश मोहबे यांचे स्थानांतरण झाल्याने येथील पद रिक्त होते. दरम्यान आरोग्य विभागाने या पदावर गोरेगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. पी. के. पटले



यांची जिल्हा शल्यचिकीत्सक म्हणून नियुक्ती केली आहे.डॉ. पी. के. पटले हे गोरेगाव ग्रामीण रुग्णालयात गेल्या काही वर्षांपासून वैद्यकीय अधिक्षक पदावर कार्यरत होते. त्या आदी डॉ.पटले यांनी ब्रम्हपुरी,नागपूर सह नक्षलग्रस्त आदिवासी भागात सुध्दा आपली सेवा दिली असून आरोग्य विभागात उत्कृष्ठ सर्जन म्हणून त्यांची ओळख आहे. सेवाज्येष्ठतेनुसार त्यांना आरोग्य विभागाकडून पदोन्नती देण्यात आली. विनंतीपर डॉ. पी. के. पटले यांना गोंदिया येथील जिल्हा शल्यचिकीत्सक पदावर बढती देण्यात आली आहे.डॉ.पटले हे मुळचे गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील रहिवासी आहेत.

# 'जलजीवन मिशन' अपूर्ण कुठे टाकी तयार; कुठे पाणीपुरवठा नाही

**मुंडीकोटा::–** तिरोडा तालुक्यात मोठा गाजावाजा करून मजलजीवन मिशन मला सुरवात करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात हे मिशन अजूनही अपूर्ण आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागतच आहे. तिरोडा तालुक्यात दोन कंत्राटदारांनी अनेक कामे घेतली आहेत. निधी मिळत नसल्याने या कंत्राटदारांनीही कामे अर्धवट ठेवली आहेत. काही गावांमध्ये टाकी तयार झाली आहे, परंतु अद्याप पाणीपुरवठा सुरू झाला नाही. १५ ऑगस्ट २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महर घर नलफया योजनेची घोषणा केली.

२०२४ पर्यंत देशातील प्रत्येक घरात नळाद्वारे पाणीपुरवठा होईल, असे आश्वासन पंतप्रधानांनी दिले. मजलजीवन मिशनफ्च्या प्रभावी अमंलबजावणीकरिता पंतप्रधानांनी देशभरातील सर्वच सरपंचांना पत्र पाठविले. योजनेत सहकार्य करण्याचे आवाहन केले. प्रत्येक व्यक्तीमागे ५५ लिटर पाणी देता



येईल, असे नियोजन या योजनेत करावयाचे होते. लोकसंख्येनुसार तेवढ्या क्षमतेच्या पाणी टाकी बांधकाम करावयाचे होते.

या योजनेचा मोठा गवगवा झाला. मात्र, तिरोडा तालुक्यात अजूनही महर घर नल से जलफ योजनेचे पाणी मिळाले नाही. तिरोडा तालुक्यात मजलजीवन मिशनफ्ची एकूण १३३ कामे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ सहा कामे पूर्ण झाली आहेत. १२७ कामे निधीअभावी रखडलेली आहेत

## डॉ.गोल्हार गोंदियाचे नवे जिल्हा आरोग्य अधिकारी

**गोंदिया:–** गोंदिया जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितिन वानखेडे यांच्या बदलीने



रिक्त झालेल्या पदावर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांची पदस्थापना करण्यात आली आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वानखेडे यांच्या स्थानातरणाने रिक्त झालेल्या पदावर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांना बढती देण्यात आली आहे. तसे आदेश सार्वजनिक आरोग्य विभागाकडून ६ जून रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

# मुर्रीच्या सरपंचावरील अविश्वास प्रस्ताव बारगळला

**गोंदिया : –** ग्रामीण राजकारणातून इतर क्षेत्रातील राजकारणाची दिशा निर्धारित होत असते. परिणामी ग्रामपंचायतच्या निवडणुका व निवडणुका झाल्यानंतर आपले वर्चस्व गाजविण्यासाठी गावातील पुढारी एकवटले दिसतात. त्यातच थेट जनतेतून निवडूण आलेल्या सरपंचावर अविश्वास प्रस्ताव आणला गेला. त्यासाठी ६ जून रोजी विशेष सभेचे आयोजन दरम्यान या सभेसाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला होता. तरीही दोन सदस्यांनी काढता पाय घेतल्याने महिला सरपंचावरील हा अविश्वास प्रस्ताव बारगळला. हा प्रकार जवळील मुर्री ग्रामपंचायतीचा आहे. या प्रकाराने मात्र एकमेकावर जय–पराजयाचे खापरही फोडले जात आहे.

सविस्तर असे की, जवळील नंगपुरा मुर्री येथे थेट जनतेतून सौ. कविता लिचडे या महिला सरपंच म्हणून विचारजमान झाल्या. ग्रामपंचायतीची एकूण सदस्य संख्या ११ आहे. दरम्यान उपसरपंच योगेश शरणागत यांच्यासह ९ सदस्यांनी सरपंच सौ. लिचडे या सदस्यांना विश्वासात न घेता कार्य करीत असल्याच्या कारणावरून प्रशासनाकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला. दरम्यान अविश्वास प्रस्तावाची दखल घेत गोंदिया शहर विभागाचे नायब तहसीलदार कावळे यांच्या अध्यक्षतेखाली ६ जून रोजी मुर्री येथील ग्रामपंचायतमध्ये विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० वाजेच्या सुमारस विशेष सभेला सुरुवात करण्यात आली. सभास्थळी सरपंच व त्यांचे समर्थक दाखल झाल्यानंतर अविश्वास प्रस्ताव सादर करणारे सदस्यही दाखल झाले.

दरम्यान उपसरपंच योगेश शरणागतही सभास्थळी आल्यानंतर त्यांना कुटुंबातील व इतर काही सदस्यांनी लगेच चोख बंदोबस्त असतांनाही सभा स्थळावरून बाहेर नेण्यास यशस्वी झाले. तर दुसरीकडे एक महिला सदस्य सौ. पालांदुरकर ह्या अनुपस्थित राहिल्या. परिणामी अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने फक्त सातच मतदान पडल्याने हा प्रस्ताव बारगळला. एकंदरीत अविश्वास प्रस्ताव पारित व्हावी, यासाठी आमदार विनोद अग्रवाल समर्थकांनी जोरदार षडयंत्र रचण्यात आला होता. मात्र तो षडयंत्र हाणून पाडण्यास सरपंच समर्थकांना यश आले. दरम्यान या वेळी गावात तनावपुर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# पहिल्याच दिवशी मिळणार विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके

**गोंदिया :–** पहिली ते पाचवी तसेच सहावी ते आठवीतील एक लाख १० हजार ३५६ विद्यार्थ्यांसाठी मागविण्यात आलेले पुस्तकसंच तालुकास्तरावर उपलब्ध होऊ लागले आहेत. आतापर्यंत सुमारे ८५ टक्के पुस्तकसंच प्राप्त झाले असून उर्वरित संच १० जूनपर्यंत प्राप्त होतील. यामुळे शाळेच्या पहिल्याच विद्यार्थ्यांच्या दिवशी हाती पाठ्यपुस्तके पडणार, यात शंका वाटत नाही.

समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथमिक) अंतर्गत जिल्हा परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा, खासगी अनुदानित तसेच अंशतः अनुदानित



इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीमध्ये शिकणारे कोणतेही बालक पुस्तकापासून वंचित राहू नये आणि त्याला पाठ्यपुस्तकाअभावी शिक्षणात अडचण येऊ नये, शाळेतील सर्व दाखलपात्र मुलांची १०० टक्के उपस्थिती टिकविणे, गळतीचे प्रमाण शून्यावर आणणे यासाठी समग्र शिक्षांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके ही योजना सुरू केली आहे. इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि खासगी अनुदानित शाळांमध्ये शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना माध्यमनिहाय, इयत्तानिहाय व विषयनिहाय मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येणार आहेत. या वर्षापासून पहिलीसाठी इयत्ता सीबीएसई पॅटर्न राबविण्यात येणार असून, त्याची पुस्तके इ. पहिलीला पुरविण्यात येणार आहेत. मसमग्र शिक्षाफ्कडून यंदा जिल्ह्यातील एक लाख १० हजार ३५६ विद्यार्थ्यांसाठी सहा लाख ६० हजार ९९२ पाठ्यपुस्तकांची मागणी करण्यात आली होती. त्यांतील सुमारे ८५ टक्के पुस्तके तालुकास्तरावर पोहोचली असून उर्वरित पुस्तके १० जूनपर्यंत पोहोचणार आहेत. यावरून शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक हाती मिळणार, असे दिसून येत आहे.

# अकरावीच्या विद्यार्थ्यांना आता बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक

**गोंदिया :–** शहर व परिसरातील बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये खासगी शिकवणी वर्गाशी हातमिळवणी होत असल्याच्या तोंडी व लेखी तक्रारी सातत्याने शिक्षण विभागाकडे येत असतात. त्यामुळे आता त्यावर नियंत्रणासाठी शिक्षण विभागाकडून कनिष्ठ महाविद्यालय आणि उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक पद्धतीनेच घेण्याच्या सक्त सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

शहरातील बहुतांश ज्युनिअर कॉलेजनी शिकवणी वर्गाशी टायअप केल्यामुळे कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती खूपच कमी आहे. ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. महाविद्यालयातील वर्गखोल्या रिकाम्या दिसतात. त्यामुळेच शिक्षण विभागाने बायोमेट्रिक पद्धतीने विद्यार्थ्यांची हजेरी आणि संपूर्ण सत्रात विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य करण्याबाबत परिपत्रक




जारी केले आहे. विद्यार्थी गैरहजर असल्यास त्याचे कारण स्पष्ट करावे लागेल, तसेच कारणदेखील न्याय्य असावे. एखादा विद्यार्थी गोंदिया शहर व परिसरातील बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये खासगी शिकवणी वर्गाशी हातमिळवणी होत असल्याच्या तोंडी व लेखी तक्रारी सातत्याने शिक्षण विभागाकडे येत असतात.

**...तर महाविद्यालयांची मान्यता रद्द होणार**

खासगी शिकवणी वर्गाशी साटेलोटे करून तेथील विद्यार्थ्यांना नामधारी प्रवेश देणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना यापुढे मोठ्या कारवाईस सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. यापुढे प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्याची बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी विद्यालयांना घ्यावी लागेल. नियमित वेळापत्रकानुसार विद्यार्थी सातत्याने गैरहजर आढळल्यास अशा विद्यालयांची मान्यता रद्द करण्याचा इशारा विभागीय शिक्षण उपसंचालकांनी आदेशात दिला आहे.

**शिक्षणाधिकाऱ्यांनी नियमित भेटी द्याव्यात**

## मूलभूत सोयी सुविधांची तपासणी करावी

**अधिकाऱ्यांकडून महाविद्यालयांची तपासणी शाळा आणि महाविद्यालयांमधील उपस्थिती तपासण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी (जिल्हा परिषद) यांनी दर महिन्याला किमान २ कनिष्ठ महाविद्यालये आणि उच्च माध्यमिक शाळांची तपासणी करणे आवश्यक आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी किमान ३ कनिष्ठ महाविद्यालयांची तपासणी करणे आवश्यक आहे. यामध्ये वेळापत्रकानुसार वर्ग सुरू होतो की नाही, याची खात्री करावी लागेल,**

## कारण करावे लागेल स्पष्ट

**विद्यार्थी गैरहजर असल्यास त्याचे कारण स्पष्ट करावे लागेल. तसेच कारणदेखील न्याय्य असावे. एखादा विद्यार्थी वारंवार गैरहजर राहिल्यास त्याला बारावी बोर्डाच्या परीक्षेला बसण्यापासून वंचित केले जाईल. कनिष्ठ महाविद्यालये आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये विहीत वेळापत्रकानुसार नियमित वर्ग सुरू ठेवणे बंधनकारक आहे.**

## नंतर मान्यता काढून घेतली जाईल

**विद्यार्थ्यांच्या उपस्थितीशिवाय शाळा किंवा महाविद्यालय सुरू असल्यास महाराष्ट्र खासगी शाळा नियम १९८१ आणि माध्यमिक शाळा तरतुदीनुसार शाळेची मान्यता काढून घेण्याची कारवाई करण्यात येईल, असेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.**

जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी महिन्यातून किमान २ कनिष्ठ महाविद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालयांना भेटी द्याव्यात. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी महिन्यातून किमान ३ विद्यालयांना भेटी द्याव्यात. हजेरीपटावरील विद्यार्थी उपस्थित आहेत की नाहीत, वेळापत्रकानुसार विषयनिहाय वर्ग सुरू आहेत की नाहीत, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिक्षकांची उपस्थिती होती.

# झेंडेपार येथे सुरू होणाऱ्या लोह प्रकल्पाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध

**कोरची:–** तालुक्यातील झेंडेपार येथ सुरु होणाऱ्या लोहप्रकल्पास ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला असून व्यापक आंदोलनाची तयारी सुरु केली आहे. कोरची येथील बिरसा मुंडा गोदुल भवनात दि. १ जून ला सरपंच संघटनेच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषदेत सरपंच संघटनेचे विदर्भअध्यक्ष संदिपठाकुर आणि कोरची तालुक्यातील संपूर्ण सरपंच उपस्थित होते. या तालुक्यातील झेंडेपार येथे खाजगी कंपनीकडून लोह प्रकल्प सुरू करण्यात येत आहे. मात्र या प्रकल्पाला ग्रामस्थ, सरपंच संघटना वपर्यावरणप्रेमींनी तिव्र विरोध दर्शविला आहे.

प्रकल्पामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होणार असून शेतीही बाधीत होईल. त्याहून गंभीर बाब म्हणजे झेंडेपार हे गाव पेसा कायद्याअंतर्गत येत असून ही ग्रामसभेचा सल्ला किंवा मंजुरी न घेता काम सुरू करण्यात आले आहे. संपूर्ण कोरची तालुक्यात मोठ्या प्रमाणात झाडे आहेत. झेंडेपार परिसरात सुध्दा मोठ्या प्रमाणात झाडे आहेत. लोह प्रकल्पासाठी हजारो झाडांची कत्तल केली जाणार आहे. त्यामुळे जैवविविधतेवर गंभीर परिणाम होणार आहे. याशिवाय शेतीची जमीन बंजर होईल, स्थानिकांचे मुख्य जिवनधारा शेती असल्याने हा प्रकल्प त्यांच्या उपजिवीकेलाच धोका निर्माण करतो असा आरोप करण्यात आला.

पेसा कायद्याअंतर्गत झेंडेपार ग्रामसभेचा स्थानिक संसाधनांच्या वापराबाबत अंतिम निर्णयाचा अधिकार आहे. मात्र स्थानिक ग्रामसभेला विश्वासात न घेता खाजगी कंपनीने थेट प्रकल्प राबविण्यास सुरूवात केली आहे. कोरची तालुक्यातील सर्व सरपंच एकत्र येत प्रकल्प विरोधात आक्रमक भूमिका घेत आहेत. प्रकल्प तात्काळ रद्द करण्यात यावा, अन्यथा तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सरपंच संघटनेने दिला आहे.

सध्या कोरची तालुक्याल असंतोषाचे वातावरण असून पर्यावरण रक्षण, शेतीचे भविष्य, आणि स्थानिक हक्क यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शासनाने यात तातडीने लक्ष घालावे अशी नागरिकांनी मागणी केली आहे. पत्रकार परीषदेस तालुकाध्यक्ष धनिराम हिडामी, दवंडीचे सरपंच रमेश तुलावी , अस्वलहुडकीच्या सरपंचा छाया बोगा, नवरगांवच्या सरपंचा कौशल्या काटेंगे, नांगपूरचे सरपंच इंदल कुमरे, बिहिटेकलाचे सरपंच किशोर नरोटे, जांभळीचे उपसरपंच मोहन कुमरे, बेडगांवचे सरपंच चेतन किरसान, मसेलीचे सरपंच सुनील सयाम यांच्यासह कोरची तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतीचे सरपंच तसेच पदाधिकारी उपस्थित होते.